
शुभांगी पासेबंद
कृष्ण कुसुमांजली





# कृष्णकुसुमांजली

शुभांगी पासेबंद

ई साहित्य प्रतिष्ठान





# कृष्णकुसुमांजली (ललित लेख संग्रह)

लेखिका : शुभांगी पासेबंद

9869004712

scpaseband@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

9869674820

प्रकाशन : २१ ऑगस्ट २०१६

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.





अर्पणपत्रिका

हा ललितसंग्रह त्या असंख्य कृष्णकळयांना अर्पण

ज्या जन्मापुर्वीच खुडल्या गेल्या

---- शुभांगी पासेबंद





**अनुक्रमणिका**
**स्तंभ संग्रह**
**लेखिका -शुभांगी पासेबंद-२१-८-२०१६**

| | **स्तंभाचे नाव** | | | **स्तंभाचे नाव** | |
|---|---|---|---|---|---|
| १ | साडी आणि धोतर | | १८ | मायेचा हळवा गाव | |
| २ | ढगांच्या गावाला जाऊ या | | १९ | शोर | |
| ३ | लेक लाडकी -वडिलांची | | 2० | जय शारदा देवी | |
| ४ | शकुनही मोहे सांगताहे | | 2१ | जिथे माझे अश्रू पडले | |
| ५ | फ्रीझ मधील बालपण | | 2२ | वेडा फकीर | |
| ६ | काय फरक पडणार | | 2३ | एकदा काय झाले | |
| ७ | हळदीची पाऊले | | 2४ | लख लख चंदेरी तेजाची | |
| ८ | धनसंचय | | 2५ | आंधळयाच्या गाई | |
| ९ | बायकांची नोकरी | | 2६ | विवाहातील चाणक्य नीती | |
| १० | प्रवाहा विरुद्ध पोहताना | | 2७ | क्षण कोसळण्याचे | |
| ११ | लिखाणाचे कागद | | 2८ | एक पोकळी मात्र उरली आहे | |
| १२ | श्रावणाचे ऊन मला झेपेना | | २९ | सोन्याचा पिंजरा | |
| १३ | आईच्या पायी | | 3० | हि वाट दूर जाते | |
| १४ | औषध न लगे | | 3१ | राम रतन धन पायो | |
| १५ | भरत वाक्य | | 3२ | मागचा बाक | |
| १६ | ती तीस वर्षे | | | | |
| १७ | आय क्विट | | | | |





# मनोगत

कृष्ण कमळ हे दिसायला खूप देखणं फुल आहे. मंद सुगंधाने मन मोहून टाकणारे. त्याच्या बाबतीत असं म्हटलं जातं कि, बाहेरच्या सगळया एक एक सुट्या अशा ,पाकळया ह्या शंभर कौरवांचं प्रतीक आहेत. मध्ये असणारे पाच केशर जणु पांडव आहेत आणि त्याच्या वर असणारे ऊभे पराग हे श्रीकृष्ण देव आहेत. असं हे फुल वेगळे तयार झालय. असं म्हणतात, जसं कौरव संख्येने जास्त असूनही त्यांच्या दुष्ट बुद्धीमुळे, मोजून पाच पांडवांकडून हरले, कारण त्यांच्यामागे श्रीकृष्ण उभा होता. त्याची चांगली बुद्धी, गोड बोलून समजावणे आणि समजून घेणे, क्रोधावर नियंत्रण ठेवणे, अशा अनेक गुणांनी समृद्ध असा, मित्र- गुरु पांडवांना भेटला. पांडव हे हि चांगल्या विचारांचे, दिलेला शब्द पाळणारे, उदार, जनतेचं हित पाहणारे विचारांनी सच्चे असणारे, असल्यामुळेच, कृष्णसखा त्यांच्या पाठीशी उभा राहतो. आता आपल्या या आयुष्यात आपले,संस्कार,पूर्व आयुष्य, हेच आपले गुरु असतात. आजूबाजूला हजार ,वेगळे विचार कौरवां सारखे वावरत असतात. अनेक गोष्टीशी आपल्याला लढायला लागते. पण आपण हरून चालत नाही.

अशा आशावादाच्या,वेगळया,छाया-प्रकाशाचे बदल दाखवणाऱ्या मनोभावनेचे रुप असे हे स्तंभ, घेऊन "कृष्णकुसुमांजली " हा स्तंभ लेखांचा संग्रह आपल्या पुढे मी ठेवते.

ही कृष्णकुसुमांजली वाचकचरणी अर्पण.

शुभांगी पासेबंद

blog.writing in a different creative way





# प्रस्तावना

स्तंभ हा साहित्य प्रकार लोकप्रिय नसला तरी विचार पेरतो. खरंतर आयुष्य म्हणजे सर्कस असते. पण ती सर्कस आपण रोजच्या सरावाने उत्तम पार पडतो. पण कधी तरी एकटेच असलो कि मनात विचार येतात, आपण आपल्याला जे हवं होत ते शेवटचं कधी केलाय. सगळयांच्या वेळा आवडी निवडी पाहता पाहता आपण आपल्याला कधी वेळ दिला? खरं ना?

अशाच आशयाची हि कविता हिच मला प्रस्तावना म्हणून आठवली

"आयष्य म्हणजे सर्कस"

आयुष्य म्हणजे सर्कस आणि आपण त्यातले जोकर

समटाईम लाफिंग समटाईम क्राईंग..

सगळं आयुष्य दुसऱ्याला सुख कशाने मिळेल

याचा विचार करत जगायचं

दुसऱ्यांचे मूड्स सांभाळण्याचा

एकच ड्रामा सतत करत राहायचं...

एका चाकाची सायकल हात सोडून चालवण्या

इतकंच कठीण आहे आयुष्य हे

पण सरावाने आता जमू लागलंय सगळं हे





कधी तरी सगळा मुखवटा उतरून स्वतःच्या

मनात डोकावण्याचा प्रयत्न केला

तर तेवढ्यात कुणीतरी समोरून

माझ्या नावाचा पुकारा केला

मग काय मला लगेच जावंच लागलं

पुढचा शो करायला

मनाला मात्र हुरहूर राहिली

मी स्वताच्या मनालाही वेळ नाही दिला..

© मना

(तनुजा इनामदार) पांचगणी

9049745999





# 1 साडी आणि धोतर

बडोद्याच्या सयाजीराव गायकवाडांच्या राजवाड्यातील, त्या कला दालनातील मूर्तींमध्ये, तसबिरींमध्ये ,स्त्रिया साडी नेसलेल्या आढळतात. घोड्यावर बसण्यासाठी , सकच्छ नऊवारी साडी नेसणे हे रूढ होते. डोक्यावर पदर, समोर निर्यांचे केळे, ओच्याचा मोठा खण ,ज्याच्यात फुले, भाज्या, वानवळा, काही ठेवता येईल असा कप्पा असे. शरीराचा कुठलाही अवयव दिसणार नाही अशी साधी साडीची बांधणी हा, त्या वेळचा थाट होता.साडी सोयिस्कर नसते असे आजच्या काऴी मानले जाते.

धुवायला सोपी ती धोती! अजूनही उत्तर प्रदेशात साडीला धोती म्हटले जाते. वरून गुंडाळायचे वस्त्र, ज्याला शिवणाची गरज नाही व जे कुणीही घालू शकते ते धोती, किंवा साडी होय. पटना जवळील दीदारगंज येथील यक्षीणीची मूर्ती, राजस्थान मधील स्कंध मातेची मूर्ती व महाराष्ट्रातील तेर नगर येथील मूर्तीं मधील स्त्रिया साडी घातलेल्या दिसतात. लेहेंगा चोळी मधील स्त्रिया काही मूर्तीत आढळतात. अर्थात लेहेंगा चोला हा साडीचाच सुधारित प्रकार ठरू शकतो. सलवार कुर्ता, चुडीदार कुर्ता, शर्ट प्यांट, झब्बा पायजमा हे शिवण कामाची गरज असलेले कपडे नंतरच्या काळात आले. अर्थात या कपड्यांवर सुद्धा ओढणी, दुपट्टा, उपरणे, गमछा पांघरला जातो. म्हणजे शरीर झाकायला बाकीचे कपडे आणि डोके झाकायला स्वतंत्र वेगळे वस्त्र ,अशी विभागणी नंतर झाली.

कुर्ता पायजमा हा मुसलमानांकडून आलेला वस्त्र प्रकार म्हटला जातो. पंजाब, जम्मू काश्मीर या भागात कुर्ता पायजमा सातव्या शतका पासून आढळतो. थंड हवेत घट्ट





कपडे व गरम हवेत भोंगळ असे हवा खेळती राहणारे कपडे वापरले जातात. धोतर व साडी हे शरीरा भोवती गुंडाळायचे हातमागावर विणलेले सुती वस्त्र कित्येक शतके वापरले गेले. सिल्क मलमल हे व्यापाऱ्यांकडून आलेले श्रीमंती वस्त्र श्रीमंत घरातच रंगाळले.  परदेशी टेरीकॉट, पॉलिस्टर, त्याच्या मजबूतपणामुळे वापरात आले तरी सुती साड्या व धोतर हाच पोशाख भारतीय मानला जातो.

कला कुसर म्हणून या साड्यांवर धोतरांवर ,विणकाम भरतकाम, काठ, किनारी लावून, रंगवून, त्या त्या प्रदेशाचे हातमाग व हस्तकला कलाकुसार यांनी सजले,खुलले.

साडी आणि धोतर यापासुनच पुढची वस्त्रे आली।





# 2 ढगांच्या गावाला जाऊ या

मी गडाची उंच चढण चढायला सुरुवात केली तेव्हा पाऊस रिपरिपत होता. अजिंक्यतारा बदलत्या काळा बरोबर बदलत गेला असला, तरीही आज त्या किल्ल्यावर ढगांनी चढाई केली होती. ढग बाहेर होते, पण मनातसुद्धा झिरपत होते. हे आक्रमण, हि धुंद ढगांची वस्ती, धुरकट संसार आपल्याला लपेटीत घेत होती.

संसार कि हर शैका का इतनाही फसाना है !

एक धुंद से आना है, एक धुंद मे जाना है !

ईथे पहाटे गेलो ना तर ,शब्द सुद्धा फुटणार नाहीत इतके आपण अवाक होतो. ढगांची मिठी आपल्या भोवती असते. पाणी आणि हवा या पासून बनलेला ढग म्हणजे एक गूढ प्रकार असतो. मात्र त्या ढगांच्या पोटात, एक ओढ असते. पावसाच्या सोनेरी थेंबांचा ओलावा दडून असतो. आपण कुठे आहोत? कोण आहोत? कशासाठी इथे आलो आहोत ? कालाचे अल्प्रवाहाचि मधली वर्ष कुठे गेली? काहीच कळत नाही. काही काळ फक्त, ती अंधुक ढगांची आकृती मनावर राज्य करते. परकायाप्रवेश करावा किंवा कुणीतरी संमोहन करावे तसे होते. पृथ्वीने झरझरीत शेला पांघरला होता. दुपट्या शेल्यामुळे ,बाजूचा हिरवागार निसर्ग ,काळे कातळ, समृद्ध वारसा, पावसाची रिपरिप आणि काळ, सर्व काही विसरून ,मला ढगांशी एकरूप व्हायला होते. एका वेगळया विश्वात आपण जातो.

देवाचे राज्य उंचावरी





ढगांच्या त्या डोंगरावरी

अशा त्या उंचावरच्या, ढगांच्या साम्राज्यात आत्मज्ञान मिळते. मानव मी मी म्हणतो मात्र आपण कुणीच नाही. या ढगांपासून तयार झालेला, एक पाऊस बिंदू ,जसा नश्वर, तशीच मी हि नश्वरच! मी अशाच अज्ञात गूढ ,ढगाळ विश्व मालेतून आले आणि अशीच धुंदीने तयार, अज्ञातात विरणार  अहंकार सोडून निसर्गाच्या छोट्या मोठ्या सोहळयातील एक कण म्हणजे आपण हे जाणायला ढगाच्या गावाला जायला हवे. अजिंक्य तारा चढायला सुरवात केली कि अहंकार वितळायला लागतो. वरवर चढत जाऊन ढगांच्या गावाला पोहोचताच आपण एकट्या असूनही ढगांशीच एकरूप होतो. डोंगरमाथ्यावर ढग ,वस्तीलाच आलेले असतात. सात आऱ्याच्या मध्ये दडलेले ते शहर म्हणजे सातारा होय. या सातही डोंगरांपैकी कुठल्याही डोंगरावर जा, ढग तळ ठोकून तुमची वाटच पाहत आहेत. चला ढगांच्या गावाला जाऊ या !





# 3 लेक लाडकी वडिलांची

जो पर्यंत मी आई वडिलांची लेक लाडकी होते, आयुष्य वेगळच होते. "माझे आयुष खूप सोप्पे सरळ, सुंदर आहे. मी काही कादंबरी लिहू शकणार नाही." मी माझ्या मैत्रिणीला म्हणाले.

"मग आनंदी कथा लिही, प्रवास वर्णन लिही" तिने सुचवले.

अग "है सबसे मधुर वो गीत जिन्हे हम दर्द के सूर मे गाते है" असे म्हटले जाते" मला अजून  दर्द अनुभव नाही त्यामुळे त्या कथा रंगणार नाहीत."

"तशी वेळपण तुझ्यावर येऊ नये." ती म्हणाली.

मात्र त्याच वेळी खिडकी बाहेर ,कदाचीत बाहेरची, कुठलीशी दुष्ट शक्ती, हसत होती. एका छोट्याशा अपघातात, आई वडील वारले. कुठलीही सूचना न देता कुणीतरी अगदी शेजारून उठून दूर परलोक यात्रेला जाते, हीच पटायला अवघड गोष्ट असते. शिवाय त्या यात्रेला जाताना, परतीचा मार्ग बंद झालेला असतो.

न थाम सके दामन, न रोक सका कोई

बडे करीबसे उठकर चल गया कोई |

त्या अपघातानंतरचे सर्वच अनपेक्षित होते. बुद्धीबळाच्या पटावरच्या त्या सोंगट्या, काळ्या किंवा पांढ़ऱ्या रंगामुळे आपल्या आहेत, कि शत्रूच्या हे त्या रंगामुऴे निदान कळते तरी! प्रत्यक्षात आयुष्यात शत्रू कोण मित्र कोण? हितचिंतक कोण? आणि बघे कोण? पूर्णपणे विचित्र अनुभव आले. गोंधळूनच गेले होते मी.

दादा तुम्हाला देवळांमध्ये जाणे आवडायचे नाही त्यामुळे छोट्या-मोठ्या देवळा मधला कुठलाही देव तुमच्या लेकीच्या मदतीला आला नाही. माझे दादा सोबत असताना कितीही संकटे आली तरीही काही वाटत नसे. कारण दादांची सुरकुतलेला तो हात, मला जन्मांतरीचा आशिर्वाद द्यायचा. मात्र दादा गेल्यावर येणार सुख हळवे करायला लागले. दुःख आले कि अक्राळ विक्राळ तोंडानी घाबरवून सोडू लागले. खूप प्रयत्न पूर्वक मला त्या काचेच्या तुकड्यांवरून, पाय रक्त बंबाळ झालेले असताना चालावे लागले. अर्जुना प्रमाणे आपल्याच  लोकांसमवेत भांडावे लागले. दादा तुमचा हात हातातून सुटला आणि सर्वच काही अवघड झाले. जे घडत गेले तेही विचित्र होते व माझी त्या घटनांवर होणारी प्रतिक्रिया मलाच कळेनाशी झाली. सर्वच गोष्टींची मला भीती वाटू लागली.

जे घडले त्याच्या वरची इतरांची प्रतिक्रिया मला सुन्न करणारी होती. काल पर्यंत मी दादांची "लाडकी लेक" होते. आज पासून मी एक घरात असणारी एक अडगळ झाले. जगण्यासाठी निरुपयोगी समृद्ध अडगळ जी कायम नकोशी होती.

या प्रसंगातून मला एकच धडा मिळाला. काहीच निश्चित नसते. ना जन्म निश्चित ना मृत्यू ! एखाद्या अपघातात होत्याचे नव्हते करून देव काय साधतो? मला समजत नाही.

क्या मुहब्बत कि बाते क्या वफा के इरादे,

रेत कि है दिवारे, जो भी चाहे गिरादे|

आयुष्य सोप्पे नसते. जेव्हा सुख जवळ असते, तेव्हा कळतच नाही कि सुखाची किल्ली हातात आहे.

"कोई लौटा दे मेरे बिते हुए दिन" असे आपण आज म्हणतो, तेव्हा त्या काळा बद्दल भूतकाळाबद्दल, वेगळी दृष्टी स्पष्ट दृष्टीकोन ,मनात तयार झालेला असतो या

कारणानर म्हणतो. खूप वेदना सहन करूनच, सुखाचे हे दुर्मीळंत्व समजते. कौतुकाचा हात फिरवायला आणि आशिर्वाद द्यायला वडील हवे असतात, आई हवी असते.

आशिर्वाद चित्रपटात मुलीच्या लग्नात आशिर्वाद द्यायला वडील येतात. वडिलांचे महत्व असतेच तसे. आपकी कसम, चित्रपटात मांडवाला आग लागल्यावर गपचूपपणे मुलीला वाचवून , प्राण सोडणारे ते लाडक्या लेकीचे, वडील असतात.

मुलींवर खूप प्रेम करायला आई वडीलच हवे. इतरांच्या लेखी ती फक्त मुलगीच असते लेक लाडकी नसते.

सर्व आई -बाबांनो ,आपल्या लेक लाडकी बरोबर, तिला आधार देत  राहा. तिला जन्माला येऊ द्या. तिला खूप प्रेम करा, तिला समजूतदार बनवा. बेटी बचावो, बेटी पढावो हे आवाहन पाळा

लेक लाडकी सर्वांचीच लाडकी असू दे! तिला गर्भातच मारू नका. असुरक्षित मुलीसुद्धा समाजाच्या लेकीच असतात. त्यांना सुद्धा लेक लाडकीच मानायला हवे. बेटी बचाओं, बेटी पढाओं !

पटते का?





# 4 शकुनहि मोठे सांगताहे

शकुन अपशकुन हे मनाचे खेळ आहेत असे म्हटले जाते. मात्र या शकुनाच्या द्वारे परमेश्वर त्याची भाषा व त्याचे आदेश आपल्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत असतो म्हणेकिंवा आपल्याला मार्गदर्शन करीत असतो. काच फुटणे, दुध सांडणे, वस्त्र पडणे, दागिना तुटणे, दिवा विझणे, भांडण होणे. अशा वेगवेगळया प्रसंगांनी अपशकुन होतो असे मानतात.

एखादी गोष्ट करायला घेतल्यावर विघ्न आले कि "नकटीच्या लग्नाला सतरा विघ्ने" असे आपण म्हणतो. या उलट शुभ शकुन झाली कि "देवाचीच मर्जी" असे म्हणतो.

भविष्य सांगणारी व्यक्ती सुद्धा अंदाजच बांधते. काही आडाखे, काही शास्त्र, काही अंदाज, काही परिस्थितीजन्य अभ्यास यांची सरमिसळ म्हणजे शकुन सांगणे. मानस शास्त्राचा अभ्यास असलेली व्यक्ती अधिक चांगल्या प्रकारे शकुन सांगते. अस्वस्थता, चेहऱ्यावरचे हावभाव, व्रत वैकल्ये यांच्या वरचा विश्वास, पूर्व इतिहास, कुळाची परंपरा ,यावरून भगत शकुन सांगतो. सुमुहूर्त काढून देतो. मंदिरात काही ठिकाणी देवाच्या मूर्तीला फुले चिकटवून जे फुल पडेल त्याचा रंग, त्या (डावी, उजवी) बाजू, वेळ यावरून शकुन सांगतात. लवंगाच्या व तांदुळाच्या पडताना जमणाऱ्या ढिगावरून भविष्याचा शकुन सांगितला जातो. पोपट पिंजऱ्यातून बाहेर येउन भविष्य सांगणारे, कार्ड घेऊन बाहेर येतो.





ट्यारो रीडिंग मध्ये ,आलेल्या कार्डावरून ,चंद्र-सुर्य ग्रह बघून आणि शस्त्र ,उपासना सुद्धा सुचवून, शकुन सांगितला जातो. क्रिस्टल बॉल ,मोठा काचेचा स्फटिक, पाण्याचे भांडे या मध्ये बघून शकुन सांगतात.

हातावरील हस्त रेषा, कॉफी कपातील फुंक. तळपायाचे ठसे, पिंपळपाना वरील हळद कुंकूवाचे तयार होणारे आकार, समुद्राची भरती ओहोटी. यांच्या गणितावरून शकुन सांगता येतो. प्रयत्न करताना मुहूर्ताची वाट पाहू नये. हे खरे असले तरीही काहीजणांचा काही गोष्टी मुहूर्तावरच करण्याकडे भर असतो. शकुनांवरून भाकित कळून ,नशीब बदलते का? बहुदा नाही "होणारे न चुके जरी येई ब्रम्हा तया आडवा.

सुचवल्या जाणाऱ्या शकुना द्वारे परमेश्वर त्याची इच्छा, ,सदिच्छा अनिच्छा प्रकट करतो. ती कळायला व वाचायला असलेले कसब मात्र आपल्याला येतेच असे नाही. म्हणूनच तर तो परमेश्वर वर आहे व आपण पामर खाली आहोत. हा लेख लिहिताना गणपतीच्या मूर्तीवरून लाल फुल खाली पडले, आशिर्वाद मिळाला. मला यश मिळेल.

शकुनहि मोहे सांगताहे !!

समाप्त





# 5 फ्रीज मधील बालपण

सकाळी, आळोखे पिळोखे देत उठलो, तेव्हा आई-बाबा दोघेही कामावर गेले होते. सांभाळायला ठेवलेली गंगू मावशी टीव्ही वरच्या मालिका इतकीच, जाहिरातीतही रस घेऊन तो टीव्ही बघत होती. बोर्डावर मला दोन सूचना होत्या. फ्रीज मधून जेवण काढून जेव. नंतर वेगवेगळया क्लासेसला जा! शाळेला सुट्टी असते तेव्हा माझे टाईमटेबल क्लासेसनेच भरलेले असते. वाटते कशाला शाळांना सुट्टी देतात देव जाणे! आजी दर सुट्टीत वेगवेगळ्या गावी पर्यटनाला जात असे. हातात माळ घेऊन बसणे हि तिची इमेज फक्त पाहुण्यांपुढेच असे. बाकी ती सदैव चीद्चीडलेली व अईसक्रीम खाणारि चंगळवादी आजी होती. लहान मुलांना काही कळत नाही म्हणतात पण माझी आईची कुचंबणा मला कळत होती. मला खूप वेळा वाटे पावसात भिजावे, खेळावे, होड्या करून गल्लीतून वाहणाऱ्या पाणलोटात सोडाव्या मात्र कधी घराबाहेर जाऊ शकलोच नाही. ल्याचची किल्ली शेजारी ठेवून आई कुलूप लावून बाहेर जाई. कुणी बेल वाजवली, तरीही दार उघडायचे नाही. अशी सक्त ताकीद आईने दिली होती.

मी पाऊस नेहमी खिडकीतूनच पाहिला. आई नेहमी कामातच असे. बाबा टीव्ही बघत, पेपर वाचत बसत. कुणालाही कुणाशी बोलायला वेळ नसे. खरेतर आई दिवसरात्र खस्ता खाते पण पुरुष प्रमुख समाज दमलेल्या बाबाची कहाणी वाचण्यातच धन्य मानतो. कारण “पुरुष देवो भवं" हाच मंत्र त्याला फळणार असतो. आखुडशिंगी बहुगुणी कपिला, गाय असावी. या अपेक्षेप्रमाणे आईने, खाल्ले नाही, पिले नाही तरी चालेल, पण तिने घर





व्यवस्थित चालवले पाहिजे हि अपेक्षा होती. दारावरची बेल वाजली तरीही ,आई व्यतिरिक्त तर, कुणीही टीव्ही समोरून हलत नसे. गोष्टी सांगणारे आजीआजोबा सिनेमा मधेच असतात. आजीच्या हाताचा गोड लाडू कथांमध्येच असतो. माझी आजी दिवसरात्र टीव्ही बघायची. एकच मालिका तीन वेळा सुद्धा बघत असे. आईला मदत करणे तर सोडाच पण तिच्या प्रत्येक गोष्टीवर टीका करून आईला नाउमेद करणे हाच आजीचा हेतू असे. मी पहीला आलो तरी "बदकाचे पिल्लू पाण्याकडे जाणार " या शब्दात आजी माझा सुद्धा अपमान करीत असे!

काही दिवस जरी आजी कुठे गेली कि मला खूप आनंद होई, निदान घर हसते खेळते होई. आई हसऱ्या चेहऱ्याने वावरताना दिसे. कोण म्हणते तरुणपिढी बिघडली आहे? काही व्रुद्ध व्यक्ती बिघडल्या आहेत. माझ्या फ्रीज मधल्या बालपणाला ,मौज मजेला चटावलेली ,मागची पिढी जबाबदार आहे. फ्रीज मधील बालपण पुन्हा कधी हि परत मिळणार नाही. आईची नोकरी, बाबांची चाकरी, आजीची भटकंती,मुशाफिरी यात माझे बालपण फ्रीज मधेच राहील.फ्रीज मोठी होत आहेत,बालधून कोणाचे कानी पडत नाही.





# 6 काय फरक पडणार?

प्रत्येक व्यक्ती विचार करताना एक विचार करते. "माझ्या असण्याने नसण्याने, लिहिण्याने, न लिहिण्याने काय फरक पडणार आहे?" बाकी लोकांना सर्व काही ठीक चालू आहे असे दिसते आहे. "ऑल इज वेल" म्हणून सर्वजण ओरडत आहेत. मी लिहिते मग स्त्री भ्रूण हत्या होत आहेत, स्त्रीलिंग गर्भपात होत आहेत. हे सत्य सर्वजण का दडवतात? सर्वत्र "ठीकठाक आहे" या मतानुसार वादाचा विषय नको कार्यक्रमाचा रसभंग नको म्हणून ,स्त्री भ्रूण हत्यांचा विषय टाळला जातो.

"ज्याचा त्याचा खाजगी प्रश्न आहे, त्याच्या घरी मुलगाच हवा" हे उत्तर देणे बेजबाबदारपणाचे आहे. निसर्गात वेगवेगळी फुले फळे असतात. झाड वेली असतात. तशीच मुले व मुली असतात. "मुली नको" म्हणणे निसर्ग नियमाच्या स्त्री पुरुष प्रमाणाच्या पूर्णपणे विरुद्ध आहे.

आपण बोलल्याने विरोध केल्याने फरक पडू शकतो. संपूर्ण समाजहिताचा जर विचार केला तर आजूबाजूच्या चुकांमध्ये प्रत्येक व्यक्ती सामील असते. isolated , anonymous असा प्रश्न म्हणावे इतकीही स्त्री भ्रूण हत्या दुर्लक्षीय नाही. वेचलेली फुले फेकून द्यावी, तशा रीतीने गर्भ बाहेर टाकणे हे माणुसकीला काळिमा आणणारे आहे. “माझ्या घरी स्त्री नको. स्त्री दुसर्या घरी जन्मु दे ,मला मुलगाच होउ दे.” हे विचार तर उथळपणाचे

आहेत.या जगात  स्त्रीला स्त्री असण्याचा कमीपणा वाटतो का? "पुरुष" असण्याचा वृथा अभिमान वाटतो का? ह्या प्रश्नाच्या मुळांशी जावून प्रश्न सोडवायला हवा.

स्त्री भ्रूण हत्या थांबवण्यासाठी काय करावे? हा प्रश्न आता ऑपशनल राहिलेला नाही. मुलींचे प्रमाण इतक्या झपाट्याने कमी होते आहे कि काही काऴाने ,उपवर तरुणांना ,लग्नाला तरुणी मिळणार नाहीत. मग हा प्रश्न ऑप्शनला  टाकता येईल का?

जन्म मृत्यू देवाच्या हातात आहे.

मुलगा कि मुलगी जन्माला यावी हे सुद्धा ,देवाचे काम ,त्या देवाच्याच हातात राहू देत कि. माझ्या एकटीच्या मताने काय फरक पडणार? हा विचार चूक आहे. तुमच्या मताने या विषयावर चर्चा करण्याने अडाणी समाजात स्त्री भ्रूण हत्या होताना आढळल्यास विरोध करण्याने ,नक्कीच फरक पडेल. जग म्हणजे शॉपिंग मॉल,hotel नाही कि फक्त मुलाचीच ऑर्डर द्यावी, मुली नको म्हणावे, स्त्री भ्रूण हत्येला विरोध करा बघा नक्की फरक पडणार!





# 7 हळदीची पाऊले

जीवनात तडजोड करावीच लागते.

तुझ्या सारख्या सामान्य स्त्री ला कुठला राजपुत्र मिळणार आहे?

आपली हुंडा द्यायची ऐपत नाही तर समोर आले आहे ते स्वीकार"

अशा विविध वाक्यांनी वधूला प्रहार करून तिला लग्नाला तयार करण्यात आले. लग्नाच्या वेळी बोहल्यावर चढल्यावर तिचे वाहणारे अश्रू माहेर सोडून येण्याचे नव्हते तर अपेक्षाभंगाचे व नवरा पसंत नसल्याचे होते. पण सोयीस्करपणे समाजाने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. मामाने पिवळी साडी घेतली, पिवळा रंग हा वाट पाहण्याचा रंग असतो. सोनेरी रंग मिळत नाही म्हणून पिवळा स्वीकारावा लागतो. म्हणून लग्नात वधूला हळद लावत असावेत. बघा दिवसभर रणरणणाऱ्या उन्हाचा रंग पिवळाच असतो. विरक्तीचा रंग पिवळा असतो. सुकलेल्या पानांचा रंग पिवळा असतो. आजच्या माझ्या या गोष्टीत कदाचित कथानक नसेल. पण विचार देण्याची माझी इच्छा मला हि गोष्ट सांगायला प्रवृत्त करते आहे. लग्न होऊन सासरी आल्यावर ती घरगडीच बनली. पाणी भरणे, सतत स्वयंपाक, चहा,पाणी, रांधणे, वाढणे इतर कामे यातच ती नववधू सर्व वेळ खपत असे. स्वतःच्या हाताने जेवण वाढून घेण्यात काय तो कमीपणा ? पण रात्री उशिरा जरी घरी कोणी आले तर हिने उठून जेवण वाढायचे. सर्वांचे खाऊन झाल्यावर उरलेले खायचे. त्यातच बाळंतपण, जुन्या साडीचे दुपटे, अंथरून, तिच्या आयुष्याचे पोतेरे होऊ लागले, खाणारी तोंडे आणि पै पाहुणे, सर्व हिच्या जोरावर होते. दिवस रात्र पाण्यात काम करून तिची पाऊले भेगांनी भरली. अष्टोप्रहर कामामुळे ती अधिकाधिक खचली. मुले नवऱ्या सारखीच सामान्य होती. त्यामुळे मुलांकडून तिच्या काही फारशा उज्वल अपेक्षा नव्हत्या.

एका पावसाळी दिवशी तिचे अदखलपात्र जीवन संपले, तिच्या हातचे खाऊन लाखो गेले असतील, पण खांदा द्यायला, चार खांदेकरी कसेबसे जमले. चार फुले सुद्धा कुणी वाहिली नाहीत. तिच्या जाण्याने काहीच फरक पडलाच नाही. पुढे नवीन हळदीची पाऊले त्या घरात आली. राबणारे हात बदलले, रुटीन तेच! हळदीला साबण लागला कि हळद लाल रंगी होते. कुंकवाचा लाल रंग रक्ताचा असतो. वेदनेचा असतो. दुःखाचा असतो. कुंकू सुद्धा लाल असते. सौभाग्य असते. हळदीची पाऊले रक्ताळली कधी तेच समजले नाही.हळदीने दुसरी पण पोळते आहे.





# 8 धन संचय

पैसा हि अशी गोष्ट असते कि ती नसल्याने माणूस दुःखी होतो. मात्र पैसा जवळ असल्याने तो सुखी होईल, याची खात्री नसते. खरेतर पैसे साठवणे किंवा धन साठवणे, हि गोष्ट सुखद आहे कि दुःखदआहे, हे निश्चित सांगता येणे शक्य नाही. पैसा साठवण्यासाठी ह्या क्षणाला कुठली तरी इच्छा मारून पैसा साठवला जातो हे वाईट असते. भाविव्श्याची तरतूद म्हणून, आजारपणात. वृद्धापकाळात आधार म्हणून पैसा उपयोगी पडतो हे सत्य आहे व हि धनसंचयाची चांगली बाजू आहे.

धनाची पिपासा म्हणजे, कुणावरही खर्च न करणे. मुलीच्या लग्नासाठी पैसे खर्च करावे लागू नये म्हणून मुली मारणे, अशी वृत्ती चुकीची आहे. जन्मतील मुली तर पेटतील चुली. असे मुलींचे महत्व असते. त्यामुळे धन हे मनुष्यबळाहून मोठे नसते. हे जाणून घ्यावे. सद्हेतूने केलेली सेवा हि धनसंचयाहून सदाचरणी ठरते.

पैसे साठवताना अविचाराने पैसे साठवू नयेत. शेअरबाजारात खाजगी फसवणुकीत, उडाला तर कावळा बुडाला तर बेडूक, अशी परिस्थिती होऊ शकते. पैसा नेहमी चांगल्या कंपनीत व राष्ट्रीयकृत ब्यांकेतच गुंतवावा. "अन्नाचा मारलेला खाली पाही नि तलवारीचा मारलेला वर पाही." अशी वेऴ येऊ नये

पैशाची दिशा झालेल्या व्यक्ती, पैशा साठी ,बोगस कंपन्या स्थापून फसवणूक करतात. घरात पैसे ठेवल्यास ,चोरीचा धोका असतो. त्यामुळे ब्यांकेत खाते उघडून पैसे सुरक्षित ठेवावे. कमीत कमी ५० रुपये भरून नो फिल अकौंट उघडता येते. "रस्ता चुकला कि दुप्पट चालावे लागते." तशी वेळ येऊ नये म्हणून दलाल, दाम दुप्पट करण्याचे आश्वासन





देणाऱ्या कंपन्या यांच्या नादी लागू नये. fancy returns never returns अशा गुंतवणुकीने फसलेले, विटलेले मन फुटके मोती होते.जोडता येत नाहीत. त्यामुळे अविश्वसनीय संस्थांकडे जाऊ नये. तुमच्या समोरचा सरऴ रस्ता असेल, तर मानमोडी करून नागमोडी कोण चालणार? सरळ समोरचा ब्यांकेचा रस्ता धरा. प्रत्येकाचे गुंतवणुकीचे निरनिराळे मार्ग असतात पण हेतू एक असतो. माझ्या कडे किती धन आहे या पेक्षा मी किती समाधानी आहे? कितपत आरोग्य भोगत आहे? माझ्या कडे चांगले मन आहे का?मी करती जगेन, खाण्या पिण्या इतपत धन आहे का? अशी छानबीन करूनच मग पैसे गुंतवावे. घराच्या रक्षणा साठी कुलूप असते. तसे हे धन सुरक्षित ठेवा.

धन संचय करा पण वैध मार्गाने. योग्य ठिकाणीच! पैसा हा साठला न राहता, खेळता राहिला पाहिजे. राजमार्गावरूनच गुंतवणूक केल्यास उत्तरार्ध सुखात जातो.

समाप्त





# 9 बायकांची नोकरी

कोणे एके काळी जेव्हा अल्लाउद्दिन खिलजीला, महाराणी पद्मिनीचे सौंदर्य बघायची इच्छा झाली, तेव्हा आरशामध्ये तिची प्रतिमा अल्लाउद्दिन खिलजीला दाखवण्यात आली. थोडक्यात काय पडदा पद्धतीमुळे पूर्वी महिलांचे नख सुद्धा, पर पुरुषांच्या नजरेस पडत नसे. काळ बदलला. बायकांच्या नोकरी मुळे ,रस्त्यावर ऑफिस मध्ये ,ब्यांकात सर्वत्र महिला आल्या व महिलांकडे रोखून बघणे, त्यांच्यावर शेरेबाजी करणे हे प्रकारही आले. काही आंबट शौकिनांची चांगलीच सोय झाली. समाजाने या गोष्टींकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले.

स्त्रियांना होणारा (पुढे) हा त्रास कामकाजाच्या ठिकाणा पर्यंत पोहोचला. नोकरीत लैगिक छळ सुरु झाला. १९९७ साली सुप्रीम कोर्टाचे जजमेंट आले आणि कामकाजाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैगिक छळ थांबवणे ,या हेतूने काही मार्गदर्शक तत्वे ठरवण्यात आली. या तत्वानुसार कामकाजाच्या ठिकाणी अशा तक्रारी ऐकण्यासाठी, एक समिती स्थापन करण्यात आली. मात्र अशा समित्यांसमोर तक्रारी येतात का? लैगिक छळवणुकीत काय काय गोष्टी येतात याची उघड चर्चा करायला सर्वजण नाखूष असतात. या विषयावर एक पोस्टर सर्व कार्यालयात देण्यात आले होते. पण ते सुद्धा काही ऑफिस मधेच लावले गेले. अशा ज्या तक्रारी सामित्यांपुढे आल्या त्यातील फक्त २% स्त्रीयानाचा न्याय मिळाला. कामातल्या चुका नसतानाही, छळ होतो, कामकाजाच्या ठिकाणी लैगिक छळ असह्य झाल्याशिवाय स्त्री तक्रार करत नाही. अगदीच गळयापर्यंत पाणी आल्यावर तिने तक्रार केली, तर आधीच तक्रार का केली नाही, याचा अर्थ आता पश्चात बुद्धीने ,तक्रार केली. तर पूर्वीच तक्रार केली नाही याचा अर्थ हा छळ सहन, करूनही बदनामी होऊ नये म्हणून गप्प बसण्या कडेच कल असतो. चर्चा, सांघिक छळ, सत्ताधारी साहेबां विरुद्ध आवाज उठवताना होणारी घालमेल, वरिष्ठांचे लांगुलचालन करण्याची व्रुती, या मुळे तक्रार करणारी महिला एकटी पडते. तक्रार बंद करण्यासाठी किंवा येन केन प्रकारे प्रकरण मिटवण्यासाठी या महिलेवर दबाव आणला जातो. बहुतांश वेळा अशा तक्रारी नोंदवल्याच जात नाहीत. बदली करणे हे बदला घेण्याचे हत्यार, त्या महिले विरूद्धच वापरले जाते.

त्रास देणारा पुरुष मात्र हसत खिदळत सत्ता उपभोगीत राहतो. व गुर्मीतच वावरतो. " तिचे तेरावे घालीन मी " अशी भाषा वापरतो, अशा लोकां विरुद्ध  बेशर्मी मोर्चा कधी निघणार?

तक्रारकर्तीचे पुढील वाक्यांनी खच्चीकरण केले जाते.

१. पावसाने झोडले, साहेबाने रागावले तर त्यात विशेष काय मानायचे?

२. त्यांच्या हातात सत्ता आहे, तू हरशील, गप्प बस

३. साहेब तुला मेमो चार्टशिट देईल, तुला खोट्या केस मध्ये अडकवेल.

४. सत्ते पुढे शहाणपण चालत नाही.

५. तो गुन्हेगार सिद्ध झाला तरीही त्याच्या विरुद्ध कार्यवाही होणार नाही.

६. तो खोटा साक्षीदार उभे करून तुझ्या विरुद्धच पोलिस केस करेल, बलात्काराची भीती तुलाच आहे. त्याला नाही.

इतर स्त्रियांचा सहकार

काही स्त्रिया नाईलाजाने गप्प बसतात. तर काहीजणी "इतरांचा प्रश्न " "त्या अमुकतमुक प्रमाणे तोंडात साखर ठेवून वावरावे" क्षुद्र अशा फायद्यासाठी साहेबाच्या पुढे पुढे करणारी अशी ती साखर वाली मग तक्रारकर्तीला बदनाम करायचे सत्र सुरु करते. जेष्ठ व वरिष्ठ स्त्री हि वंदनीय असते. एवढे सुविचार नसलेला साहेब, "म्हातारीला थेरडीला काय त्यातले कळते?" म्हणून नामोहरम करतो. गोड बोलणार्याच्या पुढे पुढे करणार्याचा त्या खोट्या साक्षीदारांना मग काहीच आठवत नसते. आपण वाईट वागलो, बोललो हे आठवताना, त्यांचा गझनी होतो. वेळ आपल्यावर किंवा आपल्या मुलीवर बहिणीवर येईल, येऊ शकते. याची जाणीव इतर कर्मचारी ठेवत नाहीत. रिमोट कंट्रोलने तक्रारकर्तीलाचा त्रास दिला जातो.

जेष्ठ महिलेला "या वयात वृद्ध स्त्रीला संरक्षणाची गरज नाही तिच्यावर या वयात कोण बलात्कार करणरे?” अशी भाषा वापरून तिचा अधिक छळ करण्यात येतो. सगळयांचेच गजनी, मधील अमीर खान होतात व त्यांना आठवेनासे होते. साहेब आपले वाईट करू शकतो, हि बिनताकदीची बाई माझे काय बिघडवणारे? अशा प्रकारे नफा नुकसानीचा हिशोब केला जातो; या बाईला साथ सोबत करण्या पेक्षा, साहेबाला उपकृत





करून फायदा काढून घ्यावा ,अशी स्वार्थी वृत्ती आढळते. तक्रार करणाऱ्या महिलेला तक्रार करणे म्हणजे "आ बैल मुझे मार" म्हणणे असते. हे युद्ध आपण जिंकलेच पाहिजे म्हणून झाशीची राणी बनून, अब्रुसाठी लढणारी तक्रारकर्ती, झाशीच्या राणी सारखीच धारातीर्थी पडणार, हे सत्य ती जनता जाणून असते. व पुढे तिची याबाबत खात्रीच होते.

कामकाजाच्या ठिकाणी होणाऱ्या छळाची चौकशी करणरी समिती असते. पण ती समिती बऱ्याच वेळा वरिष्ठांच्या दबावा खालीच काम करते. त्या समितीतील सदस्यांचा गुप्त शेरा, पुढे हा साहेब लिहिणार असतो. त्यामुळे काथ्याकुट काढून संवेदनहिनतेने गुन्हेगाराला वाचवण्यासाठीच हे सदस्य कार्यरत होतात. झुकते माप साहेबाला मिळते व तक्रार कर्तीला "चिखलात हात कशाला बरबरटून घेतेस? गप्प बस" सांगितले जाते. बार्गेन केले जाते. काहीजण वेगवेगळे भत्ते मिळावे, मीटर चालू राहावे म्हणून, म्हणजे मर्जीत राहणं आले.व्यवस्थापन अव्यबस्था पाळत राहते. त्या व्यक्ती सर्व प्रकारे त्या "स्त्री" च्या अबला असण्याचा फायदा घेतात. खोट्या पोलिस केसेस, चार्ज शिट  टाकून तिला रंजीस आणले जाते. मानसिक विकृती बाळगणाऱ्या साहेबावर निदान मानसोपचार तरी करावे! साहेबाला निर्दोशाच सोडायचे तर, चौकशीचे प्रकरण कशासाठी हवे? लैगिक छळ करणारा गुन्हेगार उजळ माथ्याने, वातानुकुलीत केबिन मध्ये, सरकारी गाड्यातून सुसाट सुटतो. स्थानिक संस्थानिकांचेच जजमेंट इथे चालते. तक्रारदार महिला शेवटी त्या संस्थेतून इच्छेने अनिच्छेने हद्दपार होते. एकटीने प्रवाह विरुद्ध पोहणे सोपे नसते त्यात ती हरते.

२०१६ च्या उल्हासनगरच्या घटनेत हेच घडले असावे. लैगिक छळाची तक्रार ज्या साहेबा विरुद्ध येते ,त्याची अगोदर बदली करायला हवी. अशा तक्रारीची पुरेशी छान बिन होवून ,अशा तक्रारींची दाखल घ्यावी आणि अशा तक्रारींवर कार्यवाही करावी. एक स्त्री संस्थे बाहेर गेली, त्याने काहीच फरक पडणार नाही म्हणून अशा महिलेच्या प्रश्ना कडे दुर्लक्ष करणे हे समाजहिताचे नाही. नोकरी करण्याऱ्या स्त्रिया या साहेबाच्या बटिक किंवा दासी नसतात. हे तत्व लैगिक छळ समितीने बिंबवणे आवश्यक आहे. बायकांची नोकरी हि त्यांचा छळवणुकीची परवानगी ठरू नये.

पण लक्षात कोण घेतो?





# 10 प्रवाहा विरुद्ध पोहताना

काम काजाच्या ठिकाणी हे युद्ध आपण जिंकलेच पाहिजे असे ठरवून एखादी महिला जेव्हा लैगिक छळवणूकी विरुद्ध आवाज उठवते. तेव्हा ते युद्ध त जिंकेल याची शक्यता फक्त २० टक्के आहे, असते. खरेतर लैगिक छळंवणूक सहन करूनही बदनामी होऊ नये म्हणून गप्प बसण्याकडे कल असतो. चर्चा, छळ सत्ताधारी साहेबांच्या विरुद्ध आवाज उठवताना होणारी घालमेल, तक्रार केल्यावर स्त्री वर आणला जाणारा दबाव यामुळे लैगिक छळवणूकीच्या बहुतांश तक्रारी या नोंदवल्या जाताच नाहीत. "बदली " हे बदला घेण्याचे हत्यार. त्या महिले विरुद्ध वापरले जाते. पावसाने झोडपले व साहेबाने रागावले तर त्यात विशेष ते काय मानायचे? "त्याच्या हातात सत्ता आहे तो तुला मेमो देईल, चार्ज शिट देईल, गप्प बस," असाच सल्ला दिला जातो. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही" असेही म्हटले जाते.

लैगिक छळवणुकीत  काय काय गोष्टी येतात, याची चर्चा करायला कुणी तयार नसते. या विषयावर एक पोस्टर जेव्हा सर्व ऑफिस मध्ये देण्यात आले, ते सुद्धा लावले गेले नाही. क्षुद्र अशा फायद्यांसाठी साहेबाच्यापुढे पुढे करणाऱ्या स्त्रिया तक्रार कर्त्या स्त्रीला बदनाम करतात. साहेब सुद्धा "त्या  "त्या अमुकतमुक प्रमाणे तोंडात साखर ठेवून वावरावे" असा सल्ला देतो. जेष्ठ व वरिष्ठ महिला अधिकारी हि त्यांच्या गोड बोलणार्यांच्या पुढे पुढे करणाऱ्यांच्या कंपूत नसेल तर तिला  "म्हातारीला काय त्यातले कळते?" म्हणून नामोहरम केले जाते. वेळ आपल्यावर येऊ शकते. याची जाणीव इतर कर्मचारी ठेवत नाहीत.

वृद्ध स्त्रीला  " संरक्षणाची गरज नाही तिच्यावर या वयात कोण बलात्कार करणरे? अशी भाषा वापरून तिचा अधिक छळ करण्यात येतो. जनांचा प्रवाह सत्तेवर बसलेल्या साहेबांच्या बाजूने वाहतो.  साहेब आपले वाईट करेल  हि  बाई माझे काय बिघडवणारे? "बिन ताकदीची बाई" तिला साथ सोबत देऊन फायदा नाही  अशा प्रकारे नफा नुकसानीचा हिशोब इतर कर्मचारी करतात. साहेबाने इतर कर्मचार्यांच्या समोर लैगिक उद्धार केले असते तरीही हे कर्मचाऱ्यांचे गजनी होतात. व "मला आठवत नाही" म्हणतात. प्रवाह विरुद्ध पोहणे सोप्पे नसते.  झाशीच्या राणीला शाहिदच व्हावे लागले त्याप्रमाणे विरोध करणारी स्त्री शेवटी हरते. उल्हास नगरच्या घटनेतही हेच दिसले. काम काजाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला आवाज उठवणे "आ बैल मुझे मार" म्हणणार .





एकीकली अल्लाउद्दिन खिलजीला आरशात पद्मिनी दाखवली होती. आज विकृता बरोबर पद्मिनी काम करते.

विरोध करता येतो पण जिंकण्याची शाश्वती काय?

कामकाजाच्या ठिकाणी लैगिक छळाची चौकशी करणारी समिती असते पण ती समिती वरिष्ठांच्या दबावाखालीच बऱ्याच वेळा व बऱ्याच ठिकाण काम करते. त्या समितीतील स्त्रियांचा व पुरुषांचा सी आर, गुप्त शेरा. हाच साहेब लिहिणार असतो. तो सूड बुद्धीने वागेल म्हणून त्यालाच झुकते माप दिले जाते. चिखलात हात कशाला बरबटून घेतेस? गप्प बस, असेच सल्ले तक्रार कर्त्या स्त्री वर लादले जातात. कुठलाही गुन्हा न करता. तिला शिक्षा दिली जाते. मीटर चालू राहावे म्हणजे टूर अलौन्स, राहण्याचा भत्ता मिळत राहावा म्हणून काही प्रृत्ती असलेल्या व्यक्ती व्यवस्थापन पाळत असते. त्या व्यक्ती त्या तक्रार कर्त्या  स्त्रीवर दबाव आणतात. खोट्या पोलिस केसेस त्या महिलेवर टाकून तिला रंजीस आणण्यात येते. व शेवटी तो साहब लैगिक छळ करणर गुन्हेगार उजळ माथ्याने वातानुकुलीत केबिन मधून, सरकारी गाड्यांमधून सुसाट सुटतो. तक्रार कर्तीवर आत्म दहनाची वेळ येते. किंवा ती व्ही आर एस घेते.

हे असे किती दिवस चालणार? मानसिक विकृती बाळगणारे व वृद्ध कुरूप स्त्रियांना अपमानित करणरे साहेब राजरोज सुटले आहेत. खरे तर सभ्य स्त्रियांना आवाज उठवणे, लैगिक छळा विरुद्ध तक्रार करणे सुद्धा अवघड झाले आहे. १९९७ सुप्रीम कोर्टचे जज मेंट असूनही कार्यालया मध्ये त्यांच्या स्थानिक साहेबांचेच जजमेंट चालते. वाटल्यास तक्रार करा पण शेवटी गप्प बसा. महिला तक्रार निवारण मंच महिला आयोगाकडे जा, पण शेवटी साहेबाच जिंकणार हे निश्चित. हे किती दिवस चालणार? तोंड बंद करणे कितीसे अवघड असते? प्रवाहा विरुद्ध पोहून हरल्या मुळेच लोक स्त्री भ्रूण हत्येकडे वळत आहेत. लैगिक छळाच्या तक्रारीची पुरेशी छानबीन केली जावी या तक्रारींची दाखल घ्यावी व या तक्रारीवर कार्यवाही व्हावी. उद्या अशी वेळ कुणावरही येऊ शकते. कार्यालये हि कामकाजासाठी असतात त कुणाची खाजगी संस्थाने नसतात. व नोकरी करणाऱ्या स्त्रिया साहेबाच्या दासी किवा बटिक नसतात. पण लक्षात कोण घेतो?





# 11 लिखाणाचे कागद

'लिखाणाचे कागद' पिशवीत घेऊन, मी अशी किती दिवस फिरते आहे कोण जाणे? न जाणे कुणीतरी प्रकाशक अचानक भेटले तर मी त्याच्या जवळ माझे टाचण देईल आणि मग मला त्या लिखाणाचे कागद त्या व्यक्तीला सुपूर्द करीन. दुसऱ्या दिवशी सकाळी मी जेव्हा आळस देत झोपेतून उठून खिडकीचे पडदे बाजूला करीन, तेव्हा ते लिखानेचे कागद ती सत्काराची फुले घेऊन येतील असे स्वप्न मला भाबडेपणाने पडे. पावसाने भिजून सुकून, पिशवीत चुरगळून खराब होऊन, खरेतर ते कागद कुठल्या नियतकालीकाकडे देण्यासारखे, स्वच्छ सुरचित राहिलेच नव्हते. पण स्वप्ने सुधा आंधळीच असतात. आणि एक दिवस तो दुर्दिन आला. रिक्षातून उतरताना मी ते कागदाचे बाड रिक्षातच विसरले. खरेतर त्या टाचणा वर माझा मोबाईल नंबर होता पण दिवसभर वाट बघूनही कुणाचाही फ़ोन आला नाही, म्हणजे ते कुणाला सापडले नसावे.

रंगांचा उघडूनिया हात पंखा

धरती गालिचे ल्याली

शालू शेले पागोटे घेऊन

सुगी शेतीपाशी आली

संध्याकाळच्या कातर वेळी

निराश आक्रमक झाली

माझे कागद कुठे गेले असतील? ज्याला सापडेल, त्याला त्याची किमत काय कळणार? माझ्या जवळ एक-दोन महिने लोळत होते तेव्हा मला स्वतःला तरी कुठे त्याची किंमत कळली होती. दार वाजले कि वाटत असे ज्याला सापडले ती व्यक्ती पत्ता शोधत





घेऊन आली असेल, पण दुधवाले, भाजीवाले. यांच्या व्यतिरिक्त कुणीही ते कागद घेऊन आले नाही. मुलगा रागावू लागला. "सांगतो कॉम्पुटर वर टाईप कर आणि ई मेल करीत जा म्हणजे कागद सुरक्षित होतो." पूर्ण दिवस रात्र उलटली आणि माझी बेचैनी वाढली. रात्रभर शब्द सतावतच होते.

सकाळी ऑफिसला जाताना वाऱ्याची वावटळ दिसली, वाटल तिला विचारावे, "बाई माझे लिखाणाचे कागद पाहिलेस का?" मी तिला पुढे विनंती केली, " वावटळीत माझे कागद माझे शब्द उडवून टाकू नकोस बाई "

वावटळ हसत म्हणाली. "शब्द म्हणजे वारा, कागद म्हणजे कचरा".

आपल्याच तोऱ्यात माझ्या डोळयात धुरळा उडवीत वावटळ निघून गेली. अशा वावटळीला कुठे माहित असते तिच्या मुळे इतर कुणीतरी कुठेतरी उध्वस्त होणार आहे हे! मी काळजी करीत बसले, माझे कशातच लक्ष लागेना. हताश मनाने समुद्र किनारी जाऊन बसले. लाटा शांतपणे त्यांचे त्यांचे काम करीत होत्या. मी त्यांना विचारले, "माझे लिखाणाचे कागद तुम्ही तुमची पाण्यात भिजवले नाहीत ना? तुमच्या विशाल सामुर्द्राच्या पोटात जर ते असतील तर मला परत द्या !

लाटा म्हणाल्या -"भारती ओहोटी आयुष्यात चालूच राहते. पाण्याने भिजूनही जे ओले होत नाहीत व ओहोटीच्या वेळी सुद्धा जे कोरडे होत नाहीत ते शब्द स्वयंभू असतात. पण शब्दांना कोण विचारतो? समुद्रातील एक थेंब उगीचच तुम्ही लेखक स्वतःला ग्रेट समजता."

लाटा मला बघून हसू लागल्या, जेव्हा एखादी वस्तू आपल्याकडे असते, तेव्हा तिची किंमत आपल्याला नसते. ती वस्तू हरवल्यावर आपण मग त्या वस्तूचे मूल्यमापन करतो, कुठेच प्रसिद्ध झाले नसते, साभार परत आले असते, तरीही ते स्तंभ एखाद्या छोट्या पुस्तक रूपाने मला प्रसिद्ध करता आले असते.

दरवाजा जवळ शिरताना त्या देठ केशरी पांढऱ्या फुलांचे, पारीजातकाचे सडे माझ्या कडे डोळे वटारून बघत होते. जणू माझ्या दुःखाला हसत होते. आमच्या सारखे अनेक फुले उमलून पायदळी जातात. तुझ्या शब्दांचे काय ते कौतुक? त्या फुल पाकळया म्हणल्या.

मुझको बरबादिका कोई गम नही

गम है बर्बादिका क्यो चर्चा हुवा?

म्हणत मी घराचे दार उघडले. परत लिहायला बसले.मला त्या पूर्वीच्या लेखांचे शीर्षक सुद्धा आठवेना, कधीही न रडणारी, मी टीव्ही समोर बसले. टीव्ही वर नेमका प्यासा लागला होता. एका लाडक्या लेखकाच्या वरील, प्रेमामुळे गुलाबो नावाची गुरुदत्तची प्रेयसी, त्या कविता प्रसिद्ध व्हाव्यात म्हणून छापखाने पालथी घालत असते. पैसे साठवत असते. त्या कविता ती शायरी प्रसिद्ध होते पण त्यापूर्वी  शायर मनाने खचून जातो. थोडक्यात काय हरवलेले लिखाणाचे कागद सापडलेच नाहीत.

कल और आयेंगे नागमोंकि खिलती कालिया चुननेवाले

मुझसे बेहतर कहने वाले, तुमसे बेहतर सुनने वाले

क्यो कोई मुझको याद करे, मत रुक जमाना मेरे लिये,क्यो वक्त अपना बरबाद करें





# 12 श्रावणाचे ऊन मला झेपेना

श्रावण हा तसा आनंदोत्सवाचा सण असतो. मात्र माझ्या नशिबी श्रावणात फारशी आनंददायी घटना कधी घडतच नाही. पावसात आनंदाने भिजावे, तर आजारपण येते. पावसावर कविता लिहायला जावे तर श्रावण सरित वाहून जाते. पावसात मळलेली वाट ,मला सुद्धा चुकवायला तयार होते. मी तर नेहमीच वाट चुकते, दिलनवाजीने , परमेश्वर फारसे काही देत नाही ,म्हटल्यावर जी वाट समोर दिसली त्या वाटेवर मी चालायला सुरुवात केली. हि वाट  म्हणजे वहिवाट नव्हती. पळवाटच होती. चांगली पंचावन्न हजार पगाराची नोकरी सोडताना मन रडले. सर्व काही हातातून सुटून गेले आहे असे वाटत होते. व्यासांनी जी व्यासकथा सांगितली ते म्हणे जीवांचे सार आहे. मी श्रीकृष्ण दर्शन घेतले. सर्व देवळांची स्तोत्रे म्हटली. पिंपळ पूजा केली. सध्याच्या नोकरीत टिकायचा, मन राखायचा प्रयत्न केला. पण हि वाट खुबसुरत मोड ठरेल का? हा विचार न करता नोकरी सोडावी लागली.

काही केल्या मनाचे समाधान होत नव्हते. मागच्या बाकावर गुपचूप बसून शब्दांची मैत्री करीत राहिले. फक्त रंगमचांवर किंवा फोटोत चमकणे म्हणजे यश नव्हे हे कळत होते. सकुशल व्यवस्थापन हवे पण तसे नव्हते. मी अध्यात्मात मन रमवायचा खूप प्रयत्न केला. देवाच्या दारी गेल्यावर जसा भाव असेल, तसा देव दिसतो म्हणतात. मग मलाच असे का वाटावे? बासरीची धून बेसूर का व्हावी? नात्यांच्या तीन पायऱ्या असतात. परिचय, मैत्री व नाते. नात्यात अधे मध्ये असे शक्यतो काहीच नसते. वरवरचे नाते हे नाते

नसतेच. सुसंवादाचे नाते जीवनात आवश्यक असते. जीवनात खरेतर भाषेचे मुलतत्व शब्द असते. शब्दांची ओळख व मैत्री होते. जशी लोक देवता व संस्कृती एकमेकांत एकजिनसी आहेत तसे खरे तर मैत्रीत व्हावे. लोकसंस्कृती म्हणजे देवदेवता, समाज ,फळे झाडे ,पक्षी प्राणी या सर्वांचेच नाते असते. शब्द शास्त्र असते व भाषा आई असते. लोक राज्यात ग्रामीण जीवनात मी रमू शकले नाही. कावळ्या बगळ्यांची गोष्ट असते. कावळयात बगळे वेगळेच. कदाचित मीच ऑड म्यान आउट असावे. कुठे जायचे मला भान नाही. न अंदाज कसले न अनुमान काही!

श्रावण मासी हर्ष मानसी म्हणतात ते कितपत खरे आहे. देवा तुझ्या दारी आले म्हणत दूर बघत राहिले. जवळ बघायचे राहिले म्हणत कधीतरी पाय खोलात गेला. श्रावणाच्या सुखद आठवणी ऐवजी वेदना उरल्या नक्षत्राचा निळा चांदवा नयनी नाचण्या ऐवजी अश्रू मध्ये सर्व वाहून जावे! एवढासा पक्षी सुद्धा बांधलेलं घरटे सोडताना किलबिल करून ओरडून आक्रोश करतो. मला मात्र त्या चार चौघां सारखे पक्ष्या सारखे सोडून जाताना ओरडण्याचे स्वातंत्र्य नसावे? माझ्या व त्या पक्षीनींचा प्रवास समांतर असूनही दुःखद व्हावा?

काटा रुतला तर ठीक आहे पण फुल हि रुतले

वैशाख वणवा भाजला तर ठीक

श्रावण सरींचे क्षण मला रुचेना

कोवळ्या उन्हाने हि जीव उमलेना





# 13 आईच्या पायी

आपल्या जीवनातील सर्वोकृष्ट व सुखमय काळ आपण आई सोबत घालवतो. प्रत्येकच व्यक्तीच्या जडण घडणीत आईचे महत्वाचे स्थान असते. माणूस व्यक्तीमत्वात ५०% भाग अनुवांशिक व ५०% पर्यावरणाचा असतो. अनुवंश २५% वडलांचा सहभाग असतो व उरलेल्या ७५ % मध्ये सर्वस्वी जबाबदारी आईचीच असते. आई बाळाला स्वतःच्या शरीरातील जीवन रसा बरोबरच संस्कारांचे बाळकडू सुद्धा पाजते. आई सारखी मैत्रीण सहचारी कुणीच नसते.

बाळ रांगताना ती पुढे उभी राहते, चालताना ती त्याचे बोट धरते. बाळ पडले तरीही त्याला पुन्हा चालायला तीच उद्युक्त करते. बाळ चुकल तर ती त्याला मारते, प्रसंगी उपाशी ठेवते. रागावते, हातावर चटका देते. पण हे सर्व ती बालकाला, अपत्याला चांगला नागरिक बनवण्यासाठी करते. आईने दिलेल्या शिकवणीच्या रूपाने आई आपल्या आयुष्यात प्रत्येक क्षणी सोबत असते. आयुष्यात खरेतर तीन "न" टाळता येणारे दुखःद प्रश्न प्रत्येकालाच पडतात. त्याची करणे बहुतांशी आपल्या प्रिय आईच्या काळजीनेच निर्माण होतात. वाढते वय झाले कि आई निराश होते. जगातलं स्वार्थाच्या अनुभवांनी खचते. आजारांनी बेजार झालेल्या आईला ,आपली सेवा करणे झेपत नाही. ती सेवा मागते. दुष्ट मृत्युच्या घाल्याने ती आपल्या पासून दूर जाते व आपण एकाकी होतो. कधी कधी या देहाच्या दैहिक दैनिकाचा, प्रत्येक व्यक्तीला कंटाळा येतो. या रोजमर्रा जीवना पासून सुटका म्हणून कुणी उपभोगाकडे अधिकाधिक वळते, कुणी पलायनवाद स्वीकारते. तर कोणी विरक्तीचा निर्वाणीचा मार्ग

चोखाळते. संसाराच्या दैनिक रुटीनला टाळायला नदी, समुद्र ओलांडून पुढे जावे लागते. आहे त्यातच अडकून पडून "चलता हैं" याला काहीच पर्याय नाही, या वृत्तीतून पुढे वेगळीच मानसिकता वाढीस लागते. चांगले काहीतरी हवे हि जिद्द वाढते. त्यावेळी परमेश्वराला आई रूप मिळते. विठू माउली, देवी माता म्हणूनच होते. खेळण्याच्या दुकानात खूप खेळणीअसतात, पण खेळून खेळून किती खेळणार? पुढे क्षणभराची विश्रांती हवी. पात्रतेच्या परिणामांच्या नंतर, उरते तीच खरी विरक्ती होय. ती खरी आई व परमेश्वर माऊली शिकवते व विरळाच मिळते.

जेव्हा आपण वृद्ध होतो. ज्या वयात आपण आईचे वृद्धत्व पाहिले असते. तसेच आपणही वागू लागतो. आई सोडून गेली तरीही या वयात आपण आता आईचीच प्रतिकृती बनतो. आईच्या मृत्यू नंतरहि आईचे अस्तित्व माझ्या रूपाने आहे. माझ्यात जर काही दोष उरले असतील तर तो सर्वस्वी माझा दोष आहे. माझ्या सद्‌गुणांचे सर्व श्रेय मी आईच्या पायीच अर्पण करते. मातृ देवो भव!

समाप्त





# 14 औषध न लगे मजला

"औषध जान्हवी तोयम वैद्यं हरि" असे औषधाचे वर्णन केले जाते. नल दमयंती या प्रसिद्ध प्रेम कथेत दमयंती म्हणते,

औषध न लगे मजला. मला औषधाचा गुण येत नाही किंवा औषध "नल" गे मजला. नल राजा परत येणे हेच मला लागू पडेल असे औषध आहे. बऱ्याच व्यक्ती आयुष्यात अशा परिस्थितीशी येउन थांबतात, कि कोणतेही औषध लागू पडत नाही आणि जे औषध लागू होणार आहे ती व्यक्ती, ती घटना ते स्वप्नारूपी औषध, मिराकल ड्रग मिळतच नाही. अंधार दाटून मन खिन्न होते व त्या खिन्नते मुळे शरीर दुबळे होते. अशा वेळी शरीरावर आजार किंवा रोगजंतू हल्ला करतो. क्ष व्यक्ती आजारी पडते.

खरेतर आजार हे तुमच्या शरीराचे एक सुचनातंत्र असते जे तुम्हाला सांगते, "माणसा ,माझ्याकडे लक्ष दे" आजारातील ते विश्रांतीचे दिवस क्षणभर विश्रांती तुम्हाला स्व-निरीक्षण करायला सांगते. अंतर्मनाची झाडाझडती घ्यायला सांगते. या कारणाने आपण आपल्या जीवन शैलीचे, स्वप्नांचे, दगदगीचे, प्राप्त परिस्थितीचे सिंहावलोकन करतो. "आरोग्यं धनसंपदा" हे विसरून सर्वच जण धनासाठी धावत सुटलेले आढळतात. पण खूप आजारी व्यक्ती सुद्धा एखाद्या देवस्थानच्या ठिकाणी चालत जाते. उंच पायऱ्या चढते कारण तिथे त्या व्यक्तीचा विश्वास असतो. मरणाची भीती नसते. घरी दिले जाणारे औषध, दवाखान्यात दाखल करून देताच, पटकन बरे वाटते. कारण त्या दवाखान्यात आपल्याला औषधोपचारांची खात्री असते. घरी दवाखान्याहून अधिक ठेप असते पण दवाखान्यात औषधोपचार तातडीने मिळण्याची खात्री असते. हृदयविकाराची व अचानक हृदयविकाराचा झटका येण्याची भीती, प्रत्येक व्यक्तीला कायम वाटते. माझा एक सहकारी





झोपेतच वारला. त्या नंतर ऑफिस मधील प्रत्येकजण आठवडा- आठवडा आजारी पडले. आजार हा कुणावरही घाला घालतो. ती "क्ष" व्यक्ती सक्तीच्या विश्रांती नंतर, दवाखान्यातून घरी आल्यावर एक दोन दिवसाच्या विश्रांती नंतर आपणच मनाचे वाचन करतो. जुन्या मित्र मैत्रिणीना फोन करतो. आईला, काकूला, बालपणीचे आवडते पदार्थ करायला सांगतो. उगीच खिडकीपाशी बसून, पक्षी, प्रकाश, आकाश, पाहून उसासे सोडतो. न जाणो हे सर्व बघायचे, उपभोगायचे किती दिवस उरले आहेत. देव जाणे! म्हणून बाळबोध इच्छा पूर्ण करून घेतो. काही दिवस आरोग्यदायी असा आहार व शैली ठेवतो. तो तेलकट, तुपकट खात नाही. "माझा साक्षात्कारी हृदयरोग" हे अभय बंगांचे पुस्तक वाचतो. तो काही काळ आहारात बदल सुद्धा करतो. पूर्वी खाऊन पिऊन अस्ताव्यस्थ पसरलेला देह आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करतो. आजारातील आळसावलेले ते काही दिवस खूप आनंदात घालवतो. फळांचा रसास्वाद घेतो. फ्रेंच फ्राएज कडे बघणे टाळतो. देव पूजा करतो.

"अजूनही संधी गेलेली नाही, ढासळलेली तब्बेत सुधारू या " असा निश्चय करतो. मात्र काही दिवसांनी ,बारीक होण्याची, वजन कमी करण्याची इच्छा संपते. बेचव असे ते औषधी पथ्याचे जेवण नकोसे होते. बेचव खाऊन, तोंडाची चव जाते. खायचे - प्यायचे सुद्धा सुख नाही, मग जगून काय उपयोग ? असे वाटू लागते आणि आपण चापून चोपून तेलकट तुपकट, बाहेरचे दणकून खाऊन पुन्हा जाड होतो. आपल्या भारत देशात, ज्या देशात कुपोषणाने, उपासमारीने होणारे मृत्यू धक्कादायक आहेत. त्या भारत देशात जाडेपणा, ओबेसिटी, त्यामुळे होणारे आजार याचे प्रमाण ६७% आहे. वजन घाटवण्याचे मार्केट मोठे आहे. अजूनही वेळ गेली नाही. जीवनशैली बदला, आचारविचार बदला, आरोग्य सुधारेल, अभिमानाने म्हणता येईल, मी कुठलेही औषध घेत नाही. औषध न लगे मजला.

माझे काहीतरी दुखत राहते पण, मला कोणतीही गोळी घ्यावी लागत नाही !





# 15 भरत वाक्य

प्रत्येक व्यक्ती या जगात काही न काही कार्य करण्यासाठीच परमेश्वराने पाठवलेली असते. एखादा सुंदर राजवाडा, स्वप्ने जागवतो. एखादी भग्न वस्तू भीती जागवून क्षणभंगुरतेचि जाणीव करून देते. वेदना एकाकीपणाची जाणीव देते.

प्रत्येक गोष्टीचा, कथानकाचा शेवट ठरलेला असतो. त्यालाच भरतवाक्य म्हटले जाते. जीवनाचे सुद्धा तसेच असते. जगात कायमचा मुक्काम कुणाचाच नसतो. गेलेल्या व्यक्तीच्या माघारी, जन पळ भर म्हणतील हाय हाय! अशीच परिस्थिती असते. आईच्या पायी ,भक्ती भावाचा नैवेद्य, अर्पण करण्यात जीवन सार्थक होते. उंबरठ्याच्या अ◌ातील घुसमट संपली, तरी भूतकाळ कधीच पुसता येत नाही. विसरू म्हणून विसरता येत नाही. हे सुद्धा भरत वाक्यच म्हणायला हवे. आपला वर्तमान काळ सुद्धा नेहमी भूतकाळातील घटनांचा परिमाण, आघात म्हणून आपण घडवीत असतो. मी खूप वेळा ठरवले मागे वळून बघायचे नाही, पण वारंवार मी आयुष्याचे पुनरावलोकन करीत गेले. चुका झाल्या त्यांचे फळ इतके मोठ्ठे व वाईट का मिळावे? मी सर्वतोपरी चांगली वागूनही खोट्या, गोडबोल्या, सहज नीतिमत्तेशी तडजोड करणाऱ्यांशी का हरले? सुख म्हणजे काय? जे मिळाले ते सुख? की जे हरवले ते सुख?

मुकी, बहिरी, मी आंधळी पडेन का तुझिया डोळा

मलिन होऊन आले आहे तुझ्या मंदिरात

सोडून जाते हे घरटे माझे तुझ्या अंगणात





न अंदाज होता मला भाबडीला

न भानावर होते कळाया तव लीला

हरले लढाई कारवा निघाला

पैलतीरी जाण्या जीव आसुसला

वय होते,

जगी मरण हाची आहे, अंत मानवाचा

भरत वाक्य म्हणतात ते हेच असावे.

रामायणात राम जेव्हा वनवासात गेला तेव्हा भरत त्यांना म्हणाले,

तू परत येई पर्यंत १४ वर्षे तुझ्या चरण पादुका सिंहासनावर ठेऊन मी राज्य करीन. १४ वर्षा नंतर तुम्ही सुखरूप आल्यावर मी राज्य तुमच्या हाती सोपवीन. अन्यथा....

भरत हा आपले वाक्य नेहमी सत्य प्रमाणित करीत असे. त्यावरून पूर्ण सत्य वाक्याला भरत वाक्य म्हणायची पद्धत आहे.

पूर्ण सत्य हे कधी कधी अर्धसत्य हि असू शकते.

सत्य हे नेहमी अंधारातच राहून जाते ,झगझगत्या प्रकाशात असत्य आणि अर्धा सत्य चमकते. हे सुद्धा भरत वाक्यच असावे.





# 16 ती तीस वर्ष

आज पासून तीस वर्षापूर्वी, मी या संस्थेत नोकरीला लागले. साडेसातशे रुपये पगार मिळाला तेव्हा खूप आनंद झाला. त्यावेळी सोने ११०० रु. तोळा होते. खरेतर आयुष्याकडून, खूप अपेक्षा होत्या पण मिळेल त्या सर्व गोष्टीशी तडजोड केली. प्रथम वर्गात पहिली येणारी होते पण वशिला नव्हता. थोरामोठ्यांच्या ओळखी नव्हत्या. त्यामुळे हि नोकरी स्वीकारावी लागली. नाईलाजाने स्वीकारली तरीही मी माझे सर्वस्व मनापासून या संस्थेला दिले.

त्या काळी स्त्रिया नोकरी करत नसत. शिक्षिका, नर्स अश्या दोनच पेशामध्ये तुरळक स्त्रिया काम करताना दिसत. सकाळी कामावर निघाले कि "सकाळी सकाळी जाते कुठे?" अशा नजरेने बघितले जाई. नोकरीच्या पहिल्या दिवशी ,चार चौघासारखे घाबरत मी कामावर गेले. वडील पोहोचवायला आले होते. आई वडिलांना सोडून मला दिवसभर "जग सुना सुना लगे रे" असे म्हणत, कानकोंडी होऊन कामावर बसावे लागले. घरी गेल्यावर "मला नोकरी करायची नाही" म्हणून रडायला सुरुवात केली. वडील म्हणाले, "माझी झाशीची राणी आहेस तू, खंबीर व्हायचे."

गावाबाहेरच्या त्या ऑफिस भोवती हिरवागार निसर्ग बहरला होता. पक्षी झाडावर गुंजन करीत असत पण दोन बसेस बदलून जावे लागे. दोन तीन महिन्यातच मी माझ्या पगारातून लुना घेतली स्वभाव सरळ असल्याने रोज कुणीतरी लिफ्ट मागत असे व मला घरी पोहोचायला उशीर होई.





मला तोंडात साखर ठेऊन खोटे खोटे गोड बोलणे कधीच जमले नाही. मात्र या ठिकाणी माझे निभावून गेले. शिवाय त्या १९८२ च्या दरम्यान साहेबांपुढे पुढे पुढे करून बढती मागण्याची, कामचोरी करण्याची पद्धत नव्हती. ते दिवस सोन्याचे होते. आज "तेरे बिन बेसुवादी बेसुवादी मेरी रतीया" असे म्हणत ते पोस्टिंग, त्या मैत्रिणी आठवत राहतात.

बढतीवर बदली झाली मी मुंबईकर झाले तरीही माझे मूळ ,त्या गावाकडल्या मातीतच रुजलेले होते. अबोल, रुसवे, मेमो, शिकायते, तडजोड, तोडफोड, अशा मार्गाने तीस वर्ष नोकरी केली. कधी कधी पैशासाठी व क्षुल्लक स्वार्थ साठी खालच्या पातळीवर येणारे कर्मचारी बघून मन विषण्ण होई. तरीही चाल ढकल करती तीस वर्ष काढली. खूप कष्ट केले. पण चीज झाले नाही. संस्था डबघाईला आली तेव्हा पन्नाशी उलटलेल्या व्यक्ती स्मार्ट नसतात. त्यांना या आधुनिक जगाचे नियम व्यवस्थितपणे कळत नाहीत. त्यामुळे सेवानिवृत्ती घ्यावी लागली. हि निवृत्ती ऐच्छिक होती. पण लादलेली होती. मनाविरुद्ध स्वीकारलेली नोकरी मनाविरुद्धच सोडली.





# 17 आय क्विट

हो मी हरले ! मी हा डाव सोडून  जात आहे. मी रडीचा खेळ खेळू इच्छित नाही. बहुतेक वेळा अगदी मंजिल जवळ आली असे वाटते तेव्हा आपण डाव अर्धा सोडून जातो किंवा कदाचित जेव्हा आपण क्विट करतो तेव्हा यशाची मंजिल जवळजवळ जवळ आलेली असते, असेही वाटते. भावी स्वप्नांची भाषा हि देवाची अभिव्यक्ती असते, मग अपयशाची भाषा हि काय अभिव्यक्ती असते? एखाद्या अवघड क्षणी परमेश्वर सुद्धा एखाद्या पळपुट्या व्यक्ती प्रमाणे आपली साथ सोडून जातो.

एकदा एका दगडाच्या खाणीतला माणूस, पाचूचा हिऱ्याचा शोध घेत असतो. खूप दगड शोधतो. रागाने पत्थर समजून शेवटचा दगड जो तो फेकतो तो दूर जाऊन पडतो. तोच हिरा असतो. ज्या वेदनेने हिऱ्याचा शोध सुरु होतो त्याच वेदनेने का संपतो? जीवनात प्रत्येकच गोष्टीची किंमत द्यावी लागते. अपयशाची सुद्धा! यायचे असेल तर ये, असे आमंत्रण सुख देत असते. सुखाने कधी आपल्याला सुंदर स्वागत करून बोलावले नाही. किंमत मोजूनच बोलावले. रात्रीचा काळाकुट्ट प्रहर सूर्योदयाच्या थोडा काळ आधी असतो.

यशाच्या शोधात निघालेल्या ,त्याचा मार्ग रक्ताळलेला पावलांचा होतो. त्या अपयशात होरपळलेल्याचा मार्ग ,वेगवेगळा असला तरीही ते ,सर्वजण यशाचा शोध घेत

असतात, हे सत्य असते. त्यांचा मार्ग वेगळा असू दे. त्यांचे ध्येय वेगळे असू दे. मी त्यांच्या त्या प्रयत्नांचा स्ट्रगलचा आदर करते. त्या शांततेची भाषा मला समजू शकते. त्यांचे धैर्य त्याग मी जाणते. हो मी क्विट केले. कारण मला सपोर्ट मिळाला नाही. पण इतरांच्या स्ट्रगलचा मी आदर करते. योग्य वेळी ते ज्या मृगजळा मागे धावताहेत, त्या योग्य अशा ,स्वप्नपूर्ती कडे ते पोहोचतील. जर सर्व विश्व त्या स्ट्रगलर्स मदत करते तसे मलाही करू शकत होते. a time will come ् ! why this time will come for them , why I had to quit ? मला माझ्या रस्त्यात कुणी अडवले नाही पण माझी ताकद संपली. तसे खास कारण नाही. पण आय क्विट खरे तर हे लिहिताना सुद्धा वाईट वाटते, पोटात तुटते. पण हो आय क्विट !





# 18 मायेचा हळवा गाव

जन्मगाव, मुळगाव, राहते गाव, आवडते गाव, सर्व मिळून बनतो मायेचा गाव ! या शीर्षकातच माया शब्द पाच अर्थानी वापरला आहे.

माया - आई

माया - धन

माया - प्रेम

माया - माझा

माया - फसवे मोहमयी

स्त्रीचे माहेर हि अशीच मायेची हळवी जागा! त्या माहेरात आईचे प्रेम असते, प्रेमळ आई वडील, बहिण भाऊ, सख्खे शेजारी,मैत्रिणी असतात. दुखल्या खुप्ल्याला साथ देणारी मंडळी असतात. कधी कधी हे माहेर हि मायाच ठरते. वरचे सर्वच आधार फसवे असतात. तरीही प्रत्येक स्त्रीला माहेरची ओढ असतेच व प्रत्येक पुरुषाला आपले जन्मगाव साजीरेच वाटते. करियर चागली झाली तरीही, नाही झाली तरीही तो गावी जातोच जातो.

कधी कधी खूप गोंधळलेल्या मनस्थितीत मी माझ्या जन्म गावीचे रस्ते गल्ल्या, देवळे,कॉलेजेस, शाळा आठवते. आणि मग इतर काही आठवतच नाही. काही अगदी छोटे छोटे बारकावे आठवतात. मध्यंतरी एक परिचित म्हणाले, बाईचे माहेराशी असलेले नाते, म्हणजे हिंदू लॉ ची एडिशन म्हणावी. त्यात नात्यांच्या गुंतागुंती बरोबर, हक्क न मिळाल्याची वेदना व अस्तित्वाची लढाई असते.





शाळेत पहिला नंबर आला ,म्हणून कोड कौतुक करणारी मंडळी, जेव्हा कौतुक करतात त्यावेळी भेदभाव करणारे सर,एखादा टोमणा मारणारा नातेवाईक, सुद्धा आठवतो. नवे बूट आठवताना आईचे भेगांनी भरलेले पाय हि आठवतात. शुभंकरोती म्हणून जेव्हा आई तुळशीपाशी दिवा लावायची, तेव्हा आईने म्हटलेली प्रार्थना व तिचे थरथरते ओठ आठवतात. पैशापेक्षाहि मोठ्ठा आधार देणारी, आपली माणसे पुढे शेवट पर्यंत साथ देऊ शकली असती तर, किती बरे झाले असते नाही? निदान त्यांचे मार्गदर्शन, त्यांचे आशीर्वाद तरी मिळाले असते. पाणी पुढे वहात जाते. मुला नातवंडांमध्ये दिवस जातात पण मायेचा हळवा गाव आठवतो.

मुठ्ठी बंद हैं सुखे फुल अभी

सर पे पिता का आशीर्वाद भी हैं |

बचपन का छोटासा गाव भी हैं

माहेरच्या आठवणींची गर्दी होऊन मनाच्या संगणकाची मेमरी फुल झाली आहे. काही फाईल्स डिलीट करायला हव्यात. पण संगणका सारखे ,फक्त नकोशा आठवणी, मेमरितुन डिलीट करणे मनाच्या बाबतीत शक्य नसते. मायेचा हळवा गाव मेमरितुन जाताच नाही.





# 19 शोर

शोर-शराबा, शोर हि शोर, अशा शब्दात ज्या गोंगाटाचे वर्णन केला जातो. साधी पोथी वाचायला घेतली तर ऐकू येणारे आवाज बघा. कुकरची शिट्टी वाजने, कुत्र्याचे भुंकणे वाहनांचे आवाज, फेरीवाल्यांची आरोळी, भांडी पडल्याचा आवाज, पंख्याची कुचकुच, बाजूच्या बांधकामाची ठोक ठोक, एखाद्या सुगृहिणीच्या घरातून वारंवार येणारा मालिकांचा आवाज, गाण्यांचे आवाज, मोबाईलचे रिंग टोन, बोलण्याचे आवाज वगैरे! कानात कापसाचे बोले घालूनही हा आवाज ऐकू येतच राहतो. ध्वनी प्रदुषणा विरुद्ध कितीही मोहिम आखल्या तरीही मिरवणुकीत ढूम ढूम, वरातीत टूम टूम, डीजे, वाद्ये वाजंत्री, बेंडबाजा, बिगुल, माईक वर होणारे कार्यक्रम, गल्ली बोऴात सतत होत राहतात. फटाके फोडण्यात, स्वतःचे खाजगी कार्यक्रम इतरांना ऐकवण्यात काय हशील? पुराणकाळातील पोथ्यांमध्ये गणपती वाजत गाजत आणावा म्हटल्यामुळे ठणाणा ठणाणा आरोळ्या ठोकत, घंटानाद करीत गणपती आणला जातो. डेसिबल या मापकात मोजूनही त्यांची बेल मोठ्यानेच वाजते. जास्तीकाल तीव्र आवाज ऐकल्यास निद्रानाश, मेंदूचे विकार, रक्तदाब हे आजार होतात. खूप गर्दीच्या ठिकाणी गेल्यावर त्या आवाजांनी गोंधळल्या सारखे होते. सतत तीव्र नाद कानावर पडणाऱ्या कामगारांवर बहिरेपणा येण्याचे गंडांतर संभवते. कोलाहलात मन गोंधळते. रागीटपणा वाढतो. काही भक्त परमेश्वराच्या देवळात जोरजोरात आरती म्हणून देवाला जागे राखण्यासाठी प्रयत्न करतात. देव काय बहिरा आहे का? God can see in darkest corner

God can listen the pin drop silence ,why we make noise?

आपण लिहून दाखवू शकतो. एसएमएस पाठवू शकतो. कानात इयर फोन लाऊ शकतो. मग आपण एवढे ध्वनी प्रदूषण का करतो? आजारी व्यक्ती, वृद्ध अशक्त, दुबळे, विद्यार्थी, रात्रपाळी करणारे यांना झोपेची गरज असते.व एकदा झोप मोडली कि पुन्हा येणे अवघड असते. शोर नावाच्या एका चित्रपटात, मुलाचा आवाज ऐकण्या साठी नायक, उत्सुक असतो मात्र, जेव्हा मुलगा बोलू लागतो, तेव्हा नायक बहिरा झालेला असतो. आज ध्वनी प्रदूषणावर वेळीच नियंत्रण न घातल्यास, हवे असणारे छोट्या लहरींचे ध्वनी ,ऐकू येणे बंद होईल, म्हणजे कानांची ती क्षमता नष्ट होईल, हा शोर कधी थांबणार?





# 20 जय शारदादेवी

नवरात्रीचे नऊ दिवस, घटस्थापना, देवीची पूजा, उपवास, जागरण नैवेद्य प्रसाद,या विविध कारणांनी भक्तिपूर्ण उत्सवी वाटतात. मात्र या नऊ दिवसांच्या पूजनात पहिले तीन दिवस कालीमाता दुर्गामातेचे पूजन केले जाते. पुढचे तीन दिवस श्री लक्ष्मी मातेची पूजा होते. व शेवटच्या तीन दिवस माता सरस्वतीचे पूजन केले जाते. जीवनाचे परिपक्कतेच्या अंतिम टप्पात, सरस्वतीचे पूजन अधिक फलद्रूप होते. फलदायी ठरते. श्री कालीमाता हि सर्व विघ्नांचा, असुरांचा नाश करते, त्या नंतर लक्ष्मी माता हि धन धान्य समृद्धी व ऐश्वर्याचे भाव वाढीस लावते. अंतर्मनाच्या शुद्धते नंतर विद्येची देवता सरस्वती हिचे पूजन केले जाते. सरस्वती वंदना-

या कुंदेन्दू तुषार हार धवला

या शुभ्र वस्त्रा वृत्ता

या वीणावर दंडमंडित करा या श्वेत पद्मासना

या ब्रम्हाच्युत शंकर प्रभूतीभिर्र

देवै सदा वंदिता

सा मां पातू सरस्वती भगवती

निः शेष जाड्या पहा !





सार- रस + स्व = स्वतः आत्मा अशी सर्व जगाचे सार स्वतः त सामावणारी ती सरस्वती अशी व्युत्पत्ती सरस्वती शब्दांची होऊ शकते. मोर कमल पत्रावर बसणारी माता सरस्वती एका हातात पवित्र ग्रंथ, दुसऱ्या हातात माला धारण करते व उर्वरित दोन हातानी ती वीणा हे वाद्य वाजवते. ज्ञान व भावना, बुद्धी व हृदयस्थ अशा विविध सद्‌गुणांचा उत्तम मिलाफ करून ती वीणेवर सुस्वर गायन करते. या देवीला आपण आळस दूर करून विद्या दान करावे अशी मागणी करतो. जगाचे निर्माण करणाऱ्या त्या ब्रम्ह देवा बरोबर सरस्वतीचा विवाह झाला आहे. जगाचे निर्माण करणाऱ्या जग निर्मात्याची ती अर्धांगी आहे. म्हणजेच निर्माणासाठी पूर्ण ज्ञान सुद्धा आवश्यक आहे. अंतिम ज्ञान हे सरस्वती देवतेच्या भाव पूजनानेच प्राप्त होते. त्यामुळेच सर्व रंग मागे राहतात व माता श्री सरस्वती देवता पांढरे वस्त्र धारण करते.

त्या शारदेच्या कृपेने मनातील अहंकार, वैभव, ज्ञान, सद्विचार, विवेक या सर्वच भावनांचे संतुलन या नऊ रात्रीत व्हावे. केवळ उत्सव, आवाज करणे, नाच गाणे, मौज मजा असा नवरात्रीचा अर्थ नाही. नऊ रात्री नंतर दहाव्या दिवशी अज्ञानरूपी राक्षसाचा रावणाचा वध करून सर्व दुष्ट शक्तींवरील विजयाचा उत्सव केला जातो. म्हणूनच त्या दिवसाला विजयादशमी म्हणतात. या दिवशी विद्यारंभ केला जातो. बुध्धी वाढावी, या हेतूने सरस्वती पूजा केली जाते व ज्ञान प्राप्तीचा संकल्प केला जातो.





# 21 जिथे माझे अश्रू पडले

रडणे हा मानवाला मिळालेला एक अधिकार आहे. जेव्हा केव्हा बाळ जन्माला येते तेव्हा ते रडले पाहिजे म्हणतात. म्हणजेच जीवनाची सुरुवात अश्रुंनी होते. नवीन मार्गावर किंवा नवीन विश्वात जाताना, कदाचित नवीन खजिन्याच्या शोधात भटकंती करताना, अश्रू निघतात.

"उगीच टिपे गाळू नकोस" ज्यांच्यासाठी तू रडतेस, त्यांची एवढी लायकी नसते कि तू त्यांच्यासाठी रडावे" असा सल्ला माझे बडील नेहमी द्यायचे. "आई रडताना ,आधी वर पहा,खाली बघून रडू नये, वर बघावे." मुलगा सांगतो. याचे कारण सांगताना तो असे म्हणतो कि, वर स्वर्गात बसलेल्या देवाकडे नजर टाकावी. तो देव त्या अश्रूंची नोंद घेतो. चित्रगुप्ताच्या वहीत आपण अश्रू गाळले याची व ज्याने आपल्यावर अश्रू गाळायची वेळ आणली याची नोंद करतो. देवाकडे सगळा हिशोब असतो. देव न्याय करतो.

कधी खेळणी तुटली, हरवली कि मुल रडते, काहीतरी हवे म्हणून हट्ट करून कांगावा करते. म्हणजे अश्रूंची किंमत व कार्यकारण भाव मानवाला, बालपणा पासूनच माहित होतो. रडणे हे हत्यार कसे वापरायचे हे माणूस फार लहान वयात शिकतो. स्त्रियांचे हत्यार म्हणजे रडणे, असे पुरुष बायकांना चिडवतात. रडण्याच्या कुंपणातून पुरुष बाहेर जाऊ शकत नाही व बायकांच्या रडण्याला, तो शरण जातो असे म्हणतात. अर्थात हे सर्व

सज्जन, सभ्य सामान्य व्यक्ती बद्दल असते. काही व्यक्तींना मी इतक्या जणांना रडवले हे सांगताना विकृत आनंद वाटतो. हीच माणसे मात्र स्वतः वर वाईट वेळ आली कि आपण किती जणांना रडवले हा हिशोब विसरतात.

दुसरी व्यक्ती रडताना दुर्लक्ष करून खुश राहणारे असतात. मुद्दाम तिला दुखावण्यासाठी अजून रडवण्या साठी "काय झाले"? असे विचारणारे असतात. तिच्या जागी आपल्यावर रडायची वेळ आली असती पण आपण तोंडात साखर ठेवली, खोटे बोलून, चापलुसी करून, नितीमुल्यांशी तडजोड करून खूष राहिलो. याचा आनंद आतल्या आत मानणारे, त्या अश्रुना हसतात. वेदना असह्य होऊन रडणाऱ्यां कडे हि माणसे सोयीस्कर दुर्लक्ष करतात. कधी अश्रुंचे शब्द होतात. कधी मोती होतात. तर कधी फुले होतात. "अश्रूंची झाली फुले" नाटका प्रमाणे अश्रू हि दुर्लक्ष करण्याजोगी गोष्ट निश्चितच नसते. आईच्या अश्रूंचा सूड घेणाऱ्या, मुलासाठी अश्रू हे अणू बॉम्ब सुद्धा बनू शकतात. "मेरी माँ कि आसुओंका बदला चुकांना हैं| असे म्हणत लढणारे रागिट नायक चित्रपटात दिसतात.

तो चित्रपट असल्यामुळे त्या अश्रूंचा बदला घेण्यात ते यशस्वी सुद्धा होतात. रडत रडत देवळात गाऱ्हाणे घालणाऱ्या नायिकेची किंवा लहान मुलाची समजूत घालायला त्याचे दुःख दूर करायला प्रत्यक्ष देव सुद्धा येतो किंवा घंटीला, देवळाच्या दरवाजा जवळील वेलीवर असलेला नाग,साप,गरुड,किंवा तत्सम प्राणी खलनायकाचा खातमा करतो. ह्या चित्रपटांचा वास्तवाशी काहीही संबंध नसतो. रडणाऱ्या व्यक्तीची दया येण्या एवढी कणव हल्ली कुणालाच नसते.

हळव्या, रडणाऱ्या व्यक्तीला अव्यावहारिक, इमोशनल फुल म्हटले जाते. इमोशनल अत्याचार व रडण्यास प्रवृत्त करणे, हा दखलपात्र गुन्हा होऊ शकत नाही. तसे प्रत्यक्ष आयुष्यात वास्तवात, अश्रुना काहीच मोल नसते. दरवर्षी होणारी गुन्ह्याची वाढती प्रकरणे, स्त्रियांवरील अत्याचार न्यालायातील खटले कज्जे, पोलिस स्टेशन वरील, खऱ्या खोट्या तक्रारी, कुटुंब न्यायालयाबाहेर रडत बसलेली मुले व कुटुंबीय बघता अश्रुंचे मोती

होतात, हि पंक्ती कालबाह्य झालेली असावी. इतर सर्व "डे" प्रमाणे उदा.मदर्स डे, फादर्स डे" क्राइंग डे" रडण्याचा दिवस ठेवावा.

रडणे हे आरोग्यासाठी चांगले असते. डोळे स्वच्छ होतात. हृदय हलके होते. काही संस्थांमध्ये नोकरी करणाऱ्यांना व चांगल काम करणाऱ्यांना इतका त्रास दिला जातो कि त्यांचे घोषवाक्य "कभी खुद पे कभी हालात पे रोना आया" असे ठेवावे.ज्या वाटेवरून मी जात राहिले त्या जागेवर माझे अश्रू पडले. तिथे तिथे मी त्याच वाटेवरून परत येताना थबकले. माझ्या त्या अश्रूंची कोणतीही निशाणी तिथे नव्हती. जग त्याच्या त्या स्वतः च्या गतीने, स्वार्थाने, दुर्लक्षाने, अलिप्ततेने पुढे पुढे चालत होते. कौन रोता हैं किसी और के खातीर ए दोस्त सबको अपनी हि किसी बात पे रोना आया|

आसुभरी हैं ये जीवन कि राहे

कोई उनसे कह दे हमे भूल जाये |

हे म्हणण्याचा काळ सुद्धा आता गेला. उनसे-हमे भूल दो सांगायची गरज नसते. ते विसरून, पुढे स्वर्थामागे धावत गेलेले असतात. मागे राहिलेल्यांनाच वाटते , आसूभरे आहेत हे रस्ते ,ठेच लागलेल्या जागी ,आज मी बघितले, जिथे माझे अश्रू पडले तिथे सुगंधी फुले उमलली आहेत. मी मात्र पुढे निघून आले आहे. माझ्या अश्रुंचे शब्द झाले आहेत. त्यांना मोल आहे कि नाही मला समजत नाही किंवा ते अश्रू मातीमोल झाले म्हणून मी रडते आहे.

वारंवार रडणारे कोणी असते. तर काहीजणांना अश्रूंचा राग येतो. अमर प्रेम चित्रपटात राजेश खन्ना (नट) आय हेट टीअर्स पुष्पा" असे वारंवार म्हणतो. मात्र सर्वात शेवटी तो म्हणतो, "रोने में इतनी ख़ुशी हैं? तो बहने दो इन आसूओंको" अश्रू हे आनंद व दुःख दोन्हीही प्रसंग साजरे करतात. आपला दुबळेपणा दिसू नये म्हणून पुरुष रडत नाहीत. रडणे हा बायकांचाच गुणधर्म मानला जातो.मै खूष हुँ, मेरे आसूओंपे न जाना" असे म्हणून दुःख लपवणारी एखादी व्यक्ती असते. तर कधी "ये आसू मेरे, दिल कि जुबान हैं" असेही म्हटले जाते. तेरे आँख से आसू पी जाऊ, ऐसी मेरी तकदीर कहाँ" असे म्हणणारा प्रेमिक असतो,प्रत्यक्ष शंकर भगवान, जटाधारी यांनी जेव्हा समुद्र मंथनात विष प्रश्न केले तेव्हा





त्यांच्या डोळयातून अश्रू आले. शंकर देवांचे अश्रू रुद्राक्ष म्हणून जमिनीवर पडल्याची कथा आहे.

आंसूओंमे जो पाया हैं गीतोमे दिया हैं

फिर भी सुना हैं कि जमानेको गिला हैं.

असे एक प्रसिद्ध गाणे आहे. रडणारी व्यक्ती "रड" म्हणून रुडाली रडते किंवा "रडू नको म्हणून रडे थांबवते का? या विषयावर संशोधन झाले असता, रडण्यावर बाह्य उपाय चालत नसून डोळ्यातून अश्रू वाहने हि प्रतिक्षिप्त क्रिया असावी असा निष्कर्ष निघाला.एका रान फुलाला सीतेची आसवे असे नाव आहे. हे फुल अश्रून्सारखे दिसते. व पठारावर मुबलक असते. "खून के आसू रुलाना" म्हणजे खूप रडवणे. असा वाक्प्रचार आहे. त्यामुळे काही फुले लालसर सुद्धा आहेत. शेतकरी पावसावर अवलंबून राहून नेहमीच अश्रू गाळतो. शेतकऱ्यांचे अश्रू अतिशय खेदजनक असतात.

जीव आहे खजील झाला. डोळे झरती आभाळाला, क्षमा याचितो आई, दीनवाणी विनवणी माझी भीडु देत काळजाला, आता अंत नको ग पाहू. बोलावी पर्जन्याला,"

शेतकऱ्याने आत्महत्या करताना "मेरी याद मॆ तुम न आसू बहाना, न जी को जलाना, मुझे भूल जाना" अशी विनंती केली गेली तरी जिथे ते अश्रू पडतात, ती जागा आपल्याला नेहमीच आठवते व अश्रू हे नेहमीच गंगाजलाहून अधिक पवित्र असतात,नक्राश्रु देखील....





# 22वेडा फकीर

खरे तर अमावस्या म्हणजे, तशी उगाचच गडद वलय असलेली असते. त्यात सर्वपित्री अमावास्या म्हणजे तर भीतीची काजळी धरणारी असते. पण पोटा पाण्यासाठी घराबाहेर पडून कामावर तर जावेच लागते. सकाळी कामावर जायला निघाले तेव्हा धो-धो पाऊस पडत होता, बराचवेळ बस आली नाही. आली तेव्हा तिच्यात कुणीही प्रवासी नव्हते. कंडक्टर ड्रायव्हर होते. मी आत चढले आणि खिडकी पकडली. अचानकच गार वाऱ्याचा झोत माझ्या जवळून गेल्या सारखा वाटला आणि खूप दचकले. माझ्या बाजूच्या सीट वर भगवी कफनी घातलेला दाढी वाढलेला एक फकीर बसला होता. बाहेर पावसाच्या थेंबांचा जोरदार आवाज येत होता.

त्या गावात वेळी अवेळी कुठल्याही जागी समुद्र किनारी तो फिरताना किंवा विमनस्क फिरताना तो लोकांना दिसत असे. तो माझ्या कडे बघून हसला. म्हणाला, "अलख निरंजन" मी हात जोडले. " आज मला तुमच्याकडून एखादे भजन ऐकायचे आहे." तो म्हणाला. त्याच्या आवाजात जरब व आज्ञा होती. मी घाबरत चाचरत नकळत गाऊ लागले.

हे परमेश्वरा माझे तुझ्यावर प्रेम आहे

मला सुखी ठेवण्यात तुझे हित आहे

कारण मी दुखी झाले तर तुलाही त्रास होईल

माणूस कितीही छोटा असू दे

देवाने त्याला निर्माण केले आहे.

त्यात त्या परमेश्वराचा हेतू आहे





मानवाला मात्र हे माहित नसू दे!

फकीर खदखदून हसला. "इथे काय करता?" त्याने विचारले. "पोटासाठी नोकरी करते. मी उत्तरले. माझ्या डोळयात नकळत पाणी आले. "खूप काम करून मिळणारा तुटपुंजा पगार, वरिष्ठ लादत असलेले अतिरिक्त काम, स्वतःच्या ऑफिस मध्ये सतरा लोक असताना माझ्या एकटीवर लादला जाणारा भार आणि वर भेदभावाची राजनीती मला नोकरीतील अगतिकता बोचू लागली. वेडा फकीर गप्प झाला. थोडा विचार करून काही वेळाने म्हणाला "ज्या ठिकाणी डोळ्यातून पाणी येतात ती जागा कायम लक्षात ठेवावी. जरी ह्या त्रासाचा बदला तू घेऊ शकली नाहीस तरीही तुमचा खजिना तिथेच असतो जिथे तुझे अश्रू पडतात किंवा ह्या त्रासामुळेच कदाचित तू वाट बदलून खजिन्याचा शोध घेण्यासाठी बाहेर पडशील."

मी खिडकी बाहेर बघत म्हणाले, " मी व्यर्थ प्रयत्न केले मी कष्ट केले, संघर्ष केला. मला कुठलाच खजिना मिळाला नाही."

"स्वतःवर विश्वास ठेव. या मृगजलातून बाहेर पड."

आयुष्याची अनेक वर्ष तू या राग-लोभ-द्वेष-राजनीती- यात घालवलीस ठीक आहे. निदान अजूनही वेळ गेली नाही तू या रोजनिशी तून बाहेर ये. मी म्हणजे एक हिमनग बनले आहे. माझे कष्ट एक अष्टमांशच बाहेर दिसत आहेत. बाकी मी आतून पूर्ण थकले आहे. "मी म्हणाले.

"मग कोसळण्याची वाट पाहत आहेस का?" वेडा फकीर म्हणाला.

"एक दिवस कामावर गेला नाहीत तर?" त्याने विचारले

" नाही खूप काम आहे, साहेब माणूस देत नाही. स्वतःच्या क्षमता वाढवा, पॉझीटिव्ह थिंकिंग करा. चार जणांचे काम करा सांगतो. व स्वतः वातानुकुलीत कार्यालयात बोल बच्चनगिरी करीत मजेत बसतो." मी उत्तरले.

"अशा ताणामुळे एक दिवस जर घरी गेला नाहीत देवाकडे गेलात तर?" त्याने विचारले

"म्हणजे?" मी चमकून विचारलं.

"आयुष्यात एक वेळ येते तिथे ,स्वल्पविराम ,अर्धविराम घ्यायचा असतो. अन्यथा पूर्णविराम झाला ,तर तुमच्या त्या साहेबाला काही फरक पडणार नाही. तुमच्या कुटुंबाला पडेल." तो म्हणाला.

"माझ्या बुद्धीचा, कष्टांचा, नम्रतेचा, गैरफायदा घेतला जातो. बाकीच्यांना फक्त सही करण्याचा पगार मिळतो. साहेबाला भाषणे ठोकायला मिळतो. चांगल्या लोकांना त्रास देऊन ऑफिस बाहेर हाकलले, कि तो वर्ग चंगळवादात, वावरायला पूर्ण मोकळा होतो." मी उत्तरले

"ऑफिस बाहेर हाकलणे परवडले, पण अशा रीतीने तो साहेब एक दिवस तुला जगाबाहेर हाकलेल" तो फकीर म्हणाला.

बस थांबली मी यांत्रिकपणे खाली उतरले. गेले कित्येक दिवस ,जाता येत ज्या बहिरीमातेच्या मंदिरात मला जायची ईच्छा होती, तो हा बस स्टाप होता. सर्वपित्री अमावास्येमुळे शुकशुकाट होता. देव बहिरा आहे हा माझा आरोप माझ्या प्रमाणे इतरही कुणी केला असावा म्हणून या मंदिराचे नाव बहिरी माता व बहिरा देव पडले असावे. पावसात चिंब भिजत निथळत मी उभी राहिले. मी मागे वळून पहिले. मैलोन मैल कुणीही नव्हते. वेडा भगवा फकीर काय साधा भगवा झेंडा सुधा दिसत नव्हता. मी मंदिराच्या आवारात शांत बसले. मोबाईल वर फोन येत होते. वेळ काढणाऱ्या कर्मचार्यांना, काम जमत नव्हते. साहेब चिडचिड करीत होता. मेमो देईन, तेरावे घालीन, अशा शिव्या देत होता. मी शांतपणे जेवणाचा डबा काढला. देवळात जेवण केले. माझ्या मनातला वेडा फकीर हसत होता.





# 23 एकदा काय झाले

आटपाट नगर होते. तिथे एक राजा राज्य करीत असे. प्रजा सुखी होती. राजा .... एकदा काय झाले... अशी कहाणी आपण वाचलेली असते. घाबरू नका. पुन्हा त्याच पठडीतली, तीच ती घीसी पिटी कहाणी मी तुम्हाला सांगणार नाही.

पूर्वीच्या अशा कहाण्यांमध्ये, इंद्रधनुष्याचा,आकाशपाळणा असतो. निरागस चेहऱ्याची राजकन्या कैदेत असते, मायेचे सुखाचे मार्ग, बहरलेले असताना, दुष्ट राक्षस त्या राजकन्येला पळवून नेतो. गाणारा पक्षी सतो. उडणारा गालीचा असतो. अशा या पौराणिक गोष्टी असतात. नवल म्हणजे त्यांच्या त्या कहाणीतील देव पावतात. व्रत केले कि देव समोर हजार होतो. पैशाचे झाड हलवले कि पैसे पडतात. पक्षी पाठीवर बसवून साता समुद्रापार, नेउन सोडतात. नदीत बुडालेली सर्व माणसे नागकन्या देवकन्यांकडे सुरक्षित असतात व जिवंत परत येतात. या देवांचे सिंह हे वाहन, दुष्टांचे नरडे फोडून देवीची शक्ती दाखवतात. देव रक्तबीजातून जन्मलेले सर्व राक्षस गिळून टाकते. स्मशानात राहणारे शंकर बाप्पा, सर्व गणांना आज्ञा करतात. फुले वाहुन, ते प्रसन्न सुद्धा होतात. या सर्व कथांमध्ये दुष्ट शक्तींवर सुष्ट शक्ती विजय मिळवतात.

प्रत्यक्षात असे होते का? एक दुष्ट राक्षस ताकदवान असतो, जो राजकन्येला पळवून नेल्यावर राक्षस राजकन्येला खाऊन टाकतो. अशी कथा सांगितली तर त्यात कथाबिजच उरणार नाही. ह्या, हि काय गोष्टी आहे? गोष्टीत मालमसाला हवा. थ्रिल हवे.





एकदा काय झाले म्हणून सुरुवात केली कि त्यात वेगळेपण हवेच हवे. एकदा काय झाले म्हणून वेगळी अपवादात्मक गोष्टी सांगितली जाते. त्यातील फिलगुड व खोटी आशा सुखावून जाते. बाहुबलीची,चांदोबाची,पऱ्यांची, उडत्या गालिचांची गोष्ट प्रत्येकालाच सुखावते. त्यात काहीतरी आनंद मिळतो म्हणून आपण त्या कथा आवडीने वाचतो.

"एकदा काय झाले " हे शब्द कानावर पडले तरी आपण कान टवकारतो. उत्सुकता शिगेस पोहोचते आणि आपण त्या घटनेची रचना जाणायचा प्रयत्न करतो. रोज घडणारी गोष्ट त्या "एकदा" मध्ये येत नाही.देवाच्या सणाच्या कहान्या एकदा काय झाले ने सुरु होतात

एकदा जे झाले ते झाले. जाऊ द्या!

सण असतात साजरे करण्याचे

नव्याचे उमेदीने,जीवनाचे स्वागत करण्याचे.





# 24 लख लख चंदेरी तेजाची

लख लख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया
झळाळती ज्योती ज्योती या!

अशा शब्दात दिवाळीचे वर्णन केले जाते. खरेतर घटस्थापने पासून,तुळशी विवाहा पर्यंतची अशी, लख लख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया बघायला मिळते. वातावरणात एक निरागस, गोड गारवा असतो. शरीरावर एक कोवळी शिरशिरी देणारा मंदसा पश्चिमेचा वर आणि पठारांवर उमलेली रंगीबेरंगी फुलांची परडी असते आणि वर आकाशात तारकांची चंदेरी रांगोळी सुंदर दिसते.

या नवरात्रीच्या पहिल्या माळे पासूनच घरोघरी दिव्यांची मंदशी वात तेवू लागते. गाभार्यातील प्रकाशावर, ती उजेड उत्सवाची छबी कोरलेली असते. महिलांसाठी हे सण रंगीत साड्यांचे, वेगवेगळया कार्येक्रमाना हजेरी लावण्याचे असतात. सवाष्णींची पूजा, देवीदर्शन, गोडधोडाचे जेवण, गरबा, भोंडला, मैत्र, मैत्रिणीची भेट, गप्पा गोष्टी, गॉसिप, यांचे ते मिश्रण असते. महागाई असली, फार पैसे नसले तरीही मजा असते. कपडे खरेदी, सुंदर जेवण, देवदर्शन लांब फिरायला जाणे, पर्यटन, गप्पा टप्पा, असे भरगच्च बेत ,या लखलखत्या दिवसांमध्ये असतात. मनात भरून आनंद असला कि एक वेगळीच आनंदाची दृष्टी मिळते. मनातील निराशा त्या आशाज्योतीच्या तेजाने पळून जाते.

आयुष्याचे पुनरावलोकन करताना आपल्याला अनेक उत्सवी दिवस, चांगल्या रंगाने व अनुभवांनी आठवतात. हे सर्व दिवस सणासुदीचे दिवस असतात. त्यांना रेशमी पोत, आकर्षक रंग व लखलख चंदेरी झालर असते. जीवनातील त्या आठवणी कायमच लक्षात राहणार असतात. त्यावेळी आपल्याकडे खूप पैसे असतातच, असे नाही. पण मन भरून आनंद असतो. आई वडिलांचे प्रेम असते. नातेवाईकांची संगत असते. मित्र मंडळींचे, मैत्रीचे बंध असतात. मनात समाधान असते व कशाची तरी आपण वाट बघत असतो. त्या वाट बघण्या मध्ये एक सुंदर आशा असते. उत्सवाचे दसरा दिवाळीचे सणासुदीचे दिवस सर्व वाचकांना व हितचिंतकांना आनंदाचे जावोत.

दसरा दिवाळीच्या शुभेच्छा !हैं अंधेरी रात पर, दिया जलाना कब मना हैं?





# 25 आंधळयाच्या गाई

मुका आंधळा मी बहिरा,आहे फार वर्षा पासून देवदेखील मुका आंधळा व बहिरा असतो असा समज वाढू लागला. माझ्या जाण्या येण्याच्या वाटेवर बहिरी मातेचे मंदिर आहे. पुढा एक भैरोबा देवस्थान आहे. बहिरोबा- शब्दावरूनच पुढे भैरोबा, भैरोनाथ नाव पडले असावे. आंधळा देव, म्हातारा देव, मुकनी माता, अशी कल्पना लोकगीतात आहे. देव देवळात नाही म्हणून काही संत सांगून गेले. देव निदान देवळात तरी असावा असे मला वाटते. माझी तशी सदिच्छा आहे. देवाची प्रार्थना केली कि देव जागा होतो. व आपल्याला त्रिशूलघेवून रक्षक, सिंह, वाघ, हत्यार, संत, भक्त कुणाला तरी पाठवतो. त्या दूता करवी संकट हरण होते. हिंदी सिनेमे बघून हि माझी भावना बरेच वर्ष प्रबळ होती. देवावर सर्व सोपवून निर्धास्त सोडणारे बरेच जण असतात. "आंधळयाच्या गाई देव राखतो" अशा खोट्या भ्रमात समाज वर्षानुवर्ष वावरला. ज्यांना काहीच करायचे नव्हते, ते सर्व जण गप्प बसले. स्त्री असुरक्षित होत्या व समाज गप्पच राहिला.

आले देवाजीच्या मना,तयाचे पुढे

कुणाचे काही चालेना





ते "हि श्रींची इच्छा" "देवाक काळजी! अशा शब्दात हतबलता व्यक्त करीत होते. एखादाच वेगळा व विसंवादी सूर उठला तरी तो फक्त पाण्यावरचा तरंग, असे विचार होते ,तो काही काळ टिकून विरून जाई. बाकी देव मुका आंधळा बहिरा आहे असे रागात, दुःखात बरेच जण म्हणताना ऐकले. मग त्या देवालाच नशीब, प्राक्तन, अशी नावे ठेवली गेली. देवावर सोपवून फसल्यावर मध्यंतरी ,मेघना पेठे यांची उत्तम कलाकृती "आंधळयाच्या गाई" या नुसार माझे डोळे उघडले. संध्याकाळच्या अंधुक संधी प्रकाशात ज्या आंधळयांनी सोडलेल्या गाई होत्या. त्यांची संख्या कमी होत चालली होती. वाघ- लांडगे अशा गाई खात होते. शिवाय या गाईंचे संरक्षण करणे दिवसेंदिवस अवघड होवू लागले. मग आंधळयांनी गाईना सांभाळणे अवघड जाते म्हणून लोकांनी स्वतःच गाई मारणे सुरु केले. गाईना मारून लोक खुश होते. बैल मारायची गरज नव्हती. बैल स्वतःचे रक्षण करू शकते होते.

स्त्री भ्रूण हत्या अशाच आंधळयांनी सुरु केल्या. मुली मरत होत्या, कुणालाही काहीच फरक पडत नव्हता. मुली जिवंत होत्या, तेव्हा पण त्यांची जबाबदारी टाळणाऱ्यानि "उभ्याने सासरी जा, आडवीच परत ये" सांगून मुलीन्बद्दलची अनास्थाच व्यक्त केली होती. आता चॉइस हाती होता. प्रगती आणि विज्ञान यांच्या सहाय्याने मुलींना आज मारले जाते. देवा या समाजातील स्त्री जातीला रक्षण करण्यात तुला अपयशच आले आहे. त्यांचा आक्रोश तुला ऐकू येत नाही.

आंधळयाच्या गाई देवाने राखाव्या. निदान मारू नये!





# 26 विवाहातील चाणक्यनिती

विवाहाबद्दल एक विनोद वाचला होता. वरसंशोधन किंवा वधूसंशोधन आणि खरेदी यात फरक काय? वर संशोधनात और अच्छा क्वालिटी दिखावो" सांगता येते. वस्तू आवडे पर्यंत थांबता येते. खरेदी केलेल्या वस्तूची एक वर्षाची ग्यारेंटी असते.

लग्न म्हणजे एक जुगार असतो. त्यात ज्या उपवर तरुणी / उपवधू तरुण बघायला मिळतात त्यात क्वालिटी वाढवून मिळत नाही. फार फार तर आकर्षक वेष्टनात सामान्य वस्तू विकता येते, चाणक्यनितीने दलाला मार्फत उत्तम प्याकिंग, व्ह्यालू एडिशन याने अगदी साधी वस्तू हि खपते.

मी चिंध्या पांघरून सोने विकायला बसलो

गिऱ्हाईक फिरकेना

मी सोने पांघरून चिंध्या विकायला बसलो

गर्दी हटता हटेना.

हि असते विवाहातील चाणक्य नीती !

वय- वयाच्या बाबतीत अंदाजाने वय सांगितले जाते.

आजार- आजार लपवले जातात.

रंग- मेकअपने मुळ रंग झाकला जातो.

पत्रिका- हवी तशी करून मिळते.

नातेवाईक - तात्पुरते हजार होतात.

स्वभाव- स्वभावातील दोष चाणक्य नीतीने लपविले जातात. खूप भांडकुदळ व्यक्तीला स्पष्ट वक्ती म्हटले जाते. रागीट व्यक्तीला, शांत सांगून पुढे भांडण झाल्यास, तुम्हीच तिला समजून घेतले नाही असे म्हणता येते. विवाह हा विशेष वागणुकीचा हक्क असतो. त्यात सारवा सरावी फसवा फसवी ला भरपूर वाव असतो. "विवाहाची गाठ बांधणे खूप सोपे असते. तोडताना खूप अवघड जाते." ह्या तत्वाचा फायदा घेऊन सामान्य गरीब ,मुलींना फसवले जाते. मध्यस्थाला भरपूर आमिष दाखवून, चाणक्य नीती अवलंबली जाते. लग्नात सर्व क्षम्य असते.

थोडक्यात काय चाणक्याने वापरलेली निती ,अजूनही चलनवलनात आहे. विवाहा बाबत गरज आहे पण सोय नाही अशी परिस्थिती विवाह योग्य वयातील तरुण तरुणींची असते. धावत्या जीवनमानात वेळही नसतो,लखोबा लोखंडे ,दलाल,टपून असतात. चाणक्यांची जागा विवाह मंडळे, शादी डॉट कॉम लग्न ठरवणारी मासिके यांनी घेतली पण ती जुगाराची वृत्ती फसवा फसवी व चाणक्यनिती अनादी काळापासून चालूच आहे.





# 27 क्षण कोसळण्याचे

फार वर्षापूर्वी व.पु.काळेंनी त्यांची कथेत लिहिले आहे.

क्षण एक भाळण्याचा

बाकी जन्म सांभाळण्याचा

आज मला म्हणावेसे वाटते

क्षण एक कोसळण्याचा

बाकी जन्म सांभाळण्याचा !

हसत्या खेळत्या आयुष्यात अचानक काहीतरी विचित्र बदल होतो. कधी काही आघात जीवनात असे होतात कि त्या क्षणी आपण कोसळतो. कायमच अपघात, घातपात, बॉम्बस्पोट वेगवेगळे आजार यामुळे असुरक्षिततेच वावरणारे आपण कमजोर झालेले असतो. एखाद्या क्षणी आपण कोसळतो. तो आघात स्वतःवर झालेला असतो किंवा जवळच्या व्यक्तीवर झालेला असतो. त्या आघातातून सावरणे सोपे नसते. घडणाऱ्या अपघातातील ,५०% अपघात बळींची काहीही चूक नसताना घडत असतात. आपण एक रस्त्याने जात असताना मागून एखादे वाहन येउन ठोकते, त्यात आपला दोष असतोच असे नाही पण त्रास आपल्याला भोगावा लागतो.





काही व्यक्ती जात्याच जन्मतःच अपघात प्रवण असतात. रस्त्यावरून चालताना खड्ड्यात पाय पडणे, वाहनात प्रवास करताना वाहन बंद पडणे, कष्टाने साठवलेले पैसे पाकीट मारून हरवले जाणे. साथीच्या आजाराला बळी पडणे. डॉक्टरांकडून चुकीचे इंजक्शन दिले जाणे, अशी विविध संकटे बिचार्यांवर,अगतिक त्यांच्यावर येतात. वरून जरी "ऑल इज वेल" दाखवले, तरीही आतून त्या हादरलेल्याच राहतात.

मै रोज एक नये गमकी राह तकता हु

किसी ख़ुशी का मेरे दिल को इंतजार नही!

अशी परिस्थिती त्यांची होते. अपेक्षा भंगाचे दुःख त्यांच्या नशिबी असते. प्रत्येकच गोष्टीची भीती वाटते. एखाद्या अनाम घटनेची भीती वाटते. कुठलाही आनंद आतपणे झिरपताना भीती वाटते. माझ्या या सुखाला कुणाची दृष्ट तर लागणार नाही ना ! हे कुणाच्याही बाबतीत घडू शकते. तो अपघात असतो, मात्र कोसळण्याच्या क्षणानंतर येतो, सावरण्याचा मोठा काळ! सावरण्याचा काळ त्या क्षणाहून,हा कऴ खूप पटीने मोठा असतो. तो क्षण जी पडझड करून गेलेला असतो. ती परत दुरुस्त होत नसते. असा कुणी स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करीत असेल तर mdt kravl.

है अंधेरी रात पर दिया जलाना कब मना है?

गिरते हुए को उठाना कब मना है ?





# 28 एक पोकळी मात्र उरली आहे.

महत्वाकांक्षा घेऊन मी त्या वेगळ्या वाटेवर लढत होते. बिन ताकतीची होते. अपयशाची भीती कुणीच जाणू शकत नाही. आपण ईतर कुणाला सांगूनही ,ती भीती दुसरी व्यक्ती जाणू शकत नाही. दोन तीनदा अपयश आले कि त्या यशाच्या मार्गावरचा विश्वास उडतो. खूप प्रयत्न करूनही आपण त्या इतरांमध्ये वेगळे असतो. जणू अनेक प्रकाश वर्ष दूर असतो !

लढाई लढताना, तेव्हा रडताना वाटते कुणीतरी गॉड फादर येईल, तुम्हाला या गर्तेतून बाहेर काढेल, पण त्याच वेळी हेही सत्य असते कि कुणीही येत नाही. आपली लढाई आपल्यालाच लढावी लागते आणि प्रयत्न ,वेडे प्रयत्न, जीवघेणे प्रयत्न करतो, यशाची ओढ आणि मग आपण त्या शर्यतीतून बाहेर जातो सर्वजण हसतात. आपली दया करतात.आपण नाराज होतो. जेव्हा काही काळाने जखम भरते तेव्हा कळते, जे हवे म्हणून आपण लढत होतो ते त्याच्या योग्य होते का? मिळणारा उपदेश बघा: संयम हवा! संतापावर अावर घालता यावा, पूर्वीचे विसरून जावे, जे समोर येईल ते स्वीकारावे, ते आनंदाने स्वीकारावे. हे सर्व सांगणे सोपे असते. हे तत्वज्ञान म्हणजे धूळफेक असते. ते लोकांना इतरांना सांगायचे असते. या गोष्टी मानव म्हणून जीन्स बरोबरच रक्तात येतात. मन हळवे ठेवू नये. हे मात्र सत्य आहे. हळवेपणा कमी होण्यासाठी काही औषध आहे का?

खूप कटकट, फरफट व धावपळ, करणाऱ्यांना जॉय ऑफ लेझीनेस, कळतच नाही.तो मलाही कळला नाही. मी धावत राहिले. मला आता विरंगुळा मिळाला आहे. हि





सुट्टी मिळाली आहे पण ह्यात एक बोच आहे. मी सुद्धा नाराज झाले आहे. कोणी काही करते, मी समाजसेवा करु शकते पण ।।।पन आहेतच.

तेल नाही वात नाही आधाराचा हात नाही
त्यांच्या घरी एकदा तरी एक दिवा लाव
नाही आणले तोडून आकाशातले तारे जरी
नव्या नव्या विचारांचे रोज घातले वारे
नसेल कधी माळला गजरा माझ्या साठी
आयुष्याच सुगंधित केले सतत राहून पाठी|

हे सर्व शब्द जखमेवर फुंकर घालतात , मात्र अपयशाची बोचणी जात नाही. इतरांसाठी काहीतरी करायचे होते. हे माझे धेय्य होते. मात्र मी स्वतःसाठीदेखील काहीच करू शकले नाही. जग बदलण्याच्या काहीतरी चांगले करण्याच्या विचाराने मी झपाटलेले होते. मात्र ..... आता यशस्वी होण्याचे झपाटलेपण नाही, ते ओझे नाही ,पण पोकळी मात्र उरली आहे. संशोधनाच्या कार्यातून, मी निवृत्त होऊन परत आले आहे.





# 29 सोन्याचा पिंजरा

काही वेळा माणसे पैशासाठी, क्षुद्र पायरीवर उतरतात. कधी वाटते बरे झाले, मला समजले जगात पैशाला सुद्धा खूप अवास्तव महत्व असते. आयुष्यात मिळणाऱ्या प्रत्येकच गोष्टीची ,नेहमीच काही ना काही किंमत द्यावी लागते. युद्ध असो किंवा नोकरी, प्रेम असो जीवनात प्रत्येक गोष्टीच्या बदल्यात, बार्टर अदलाबदली सिस्टिमने, मोबदला द्यावा लागतो. काहीतरी किंमत मोजून दिल्यावरच गुप्त खजिन्याचा रस्ता समजतो. गाडीचे छोटेसे तिकीट मिळते.. शिक्षण सुद्धा फुकट मिळत नाही.

पैसा हे एक कटू सत्य असते. जे नेहमीच अस्वथ करते.

जिंदगी में कभी कुछ पाने के लिये, कुछ खोना पडता है|

काही जणांना जीवनाच्या परीक्षेत काही प्रश्न न सोडवता त्यावर शक्ती वेळ न घालवता, शक्ती

वाया न घालवता ते प्रश्न ,तसेच, अन्नुत्तरीत, ऑप्शन ला, टाकून पुढचा पेपर सोडवण्यात शहाणपणा दाखवायचा असतो. कधी युद्ध भूमीतून माघार घेण्यात हुशारी दाखवणे योग्य असते. परिस्थितीशी आहे तशी स्वीकारण्यात असते तर त्यात कधी बदलाची आशा न धरता वाहत जाण्यातच शहाणपण,मग खरी चतुराई असते. अर्थात हे पटतेच असे नाही. पटले समजा, तरी अंमलात आणणे सुद्धा सोप्पे नसते. टोचणारी छळणारी टोचणी

तशीच सोडावी लागते. मात्र एखाद्या क्षणी संतापून, पण बंड करावे लागते. दगड बंड करीत नाहीत.पत्थर के दिलमे शोले नही होते

बंड माणूस करतो हळवा माणूस जो दुखावला जातो. बंडात हरतो, शहीद होतो. पण दगडा सारखे पडून राहणे त्याला पटत नाही. खरे स्वप्न पूर्ण होण्या साठी लढावेच लागते. दगडा सारखे निद्रिस्त पडून राहून काही उपयोग नसतो. मात्र विरोध केला गेला, तर आहे ते सुद्धा हातातून सुटू शकते. चमचेगिरी ना करता मी खूप पुढे निघून आले. एका कोपर्यातील फटीतून फार पूर्वीच मागे पडलेला परिसर दिसत होता. मी डोकावून थबकून पाय उंच करून त्या परिसराकडे पहिले. थोड्या दिवस पूर्वीचा काहीवेळा पूर्वीचा वर्तमानकाळ ,आता भूतकाळ झाला होता.आठवणीत जमा झाला होता.

मी तो भूतकाळ मागे सोडून पुढे आले होते. माझ्या नव्या स्वप्नाच्या वाटेवर एक स्थिर श्रीमंत, संरक्षित क्षेत्र मी मागे सोडले होते. मात्र मला ह्या नव्या क्षणाला फक्त माझे भविष्य दिसत होते. माझे स्वप्न नव्याने दिसत होत. मला माझ्या सुरक्षित नोकरीतून बाहेर वादळात जायची वेळ आणणाऱ्या त्या दुष्ट क्षणाला मी शिव्या दिल्या. शाप दिले. जुगारात हरण्याची शिक्षा मोठी असते. नवी नोकरी शोधने सुद्धा जुगारच असतो. नोकरीच्या ठिकाणी साहेबाला बरेच नोकर मिळतात, आपल्याला मात्र पोटावर लाथ बसते. कंपनी बंद पडणे हे एखाद्या वादळी झंझावाता सारखे असते

सोन्याच्या पिंजऱ्यात माणूस सुरक्षित असतो. तो त्या पिंजार्यालाच घर समजू लागतो. सुरक्षित नोकरीत अनेक तडजोडी करीत नोकरदार माणसे राहतात. एखाद्या क्षणी मग छंदासाठी, समाजसेवे साठी, कलेसाठी सोन्याचा पिंजरा सोडून बाहेर पडावे लागते. सोन्याचा पिंजरा सोडवा का? अनेक वर्ष नोकरी करूनही स्वतः च्याच भविष्य निर्वाह निधीचे पैसे सुद्धा न घेता , ती अनामिका त्या संस्थेतून बाहेर पडली.

काळ बदलला, झाशीच्या राणीला फार वर्षापूर्वीच बंडात मारले गेले होते. बदलत्या काळात तर झाशीच्या राणीचे विचारसुद्धा मारायचा प्रयत्न होतो.पैशा वाचून जगणे सुद्धा कठीण असते. पण खूप पैसे असल्याने जगणे सुसह्य होऊ शकते. पण सुखी होईल याची काय खात्री? परदेशी जाऊन प्रश्न बदलतील, सुटतील का? परदेशी शिक्षणाच्या





संधीचा शोध ती घेऊ लागली. सोन्याच्या पिंजाराला सारवलेल्या त्या व्यक्तीला एकदम उडान भरने जमत नव्हते.

हो के मजबूर मैने हि उन्हे भुलाया

बंद कमरेमे जो खत मेरे जलाये होंगे|

त्याचवेळी परदेशी विद्यापीठाचा भारतीय स्त्रियांचे नोकरी करणे व घर सांभाळणे अशा दुहेरी भूमिकेत निर्माण होणारे प्रश्न या विषयावर संशोधन करण्याची संधी अचानक तिच्या सामोरी आली. तिने हि संधी स्वीकारली. भारत छोडो म्हणून परदेशी जाणाऱ्या सुशिक्षितावर टीका होते पण सन्मानाने जगण्याची दुसरी संधी, तिला त्या परदेशी जाण्याने दिली.निर्भया होणे वाईट होते,पण टळलर नाही.

आज मेरी, नझमा,अधकुमारी, कन्याकुमारी अशा अनेक नावांनी त्या संधीची वाट बघत राहणाऱ्या अनामिक राधेची आठवण येते. सोन्याचा पिंजरा सोडून तिने भविष्याकडे भरारी घेतली.





# 30 हि वाट दूर जाते.

आयुष्याची वाट, आपल्याला नेहमीच दूर घेऊन जात असते. सुखि जीवनात एखादे वळण येते,जे धक्का देते.अज्ञातांच्या दिशेने,असे भरकटत जाणारे हे काळ रुपी नदीचे तट ,याला जीवनाला प्रवास म्हणतात. पण या प्रवासात आपण एकटेच असतो. सोबती असतात, पण चालावे लागते ते आपल्याला एकट्यालाच!

ना तो कारवा कि तलाश है
ना तो हम सफरकी चाह है

असे म्हणत तो एकाकी प्रवास कासाबसा चालू असतो
शहर कि अनजान सडकोंपे मै बेसहारा फिरू
जग्मगाती जगती गलियोमे आवारा फिरू
इस राहमे किसी मोड पर कही चल न  देना तू छोडकर, मेरे हमसफर|

तनहाईची भीती अशा शब्दात त्या वाटेवर एकटेपणाने, बेसहारा, बेदखल होण्याची भीती प्रत्येकालाच असते.

साथी न कोई मंजिल दिया है न कोई महफ़िल





चला मुझे लेके ए दिल अकेला कहा?

तरीही युही चला चल राही युहि चला चल!

ये रस्ता है रेटे, ये देश है तेरा.... म्हणत काही गोष्टी सहन करीत रहावेच लागते.

जीवन चलने का नाम

चलते रहे सुबह शाम, ये रस्ता कट जायेगा मित्रा|

उन्हा तान्हात, पावसाच्या सरींमध्ये भिजत बदलत्या ऋतुंशी जुळवत

मुसाफिर हु यारो

ना घर है ना ठिकाना

मुझे चलते जाना है बस चलते जाना !

म्हणावेच लागते. कधी आनंदाच्या आश्चर्याचे वेळी म्हणायचे - जिंदगी एक सफर है सुहाना,

यहा कल क्या हो किसने जाना !

सफर के वक्त में दिलोको तोडती

वो तुम नाही तो कौन था, तुम्ही तो थी,

कंटाळा आला मन विटले कि म्हणायचे,

ए मेरे दिल कही और चल, गम कि दुनियासे दिल भर गया!

म्हणजे पुन्हा चालणे,पुन्हा भटकंती, पुन्हा प्रवास करावाच लागतो.

यह राह कहासे है

ये राह कहा तक है

एक मोडके आने तक हर मोड सुहाना है |

किंवा राही मतवाले तू छेड इकबार दिल कि पुकार ....

म्हणत हाका मारत राहायचे. क्षणभराची विश्रांती अनंतकाळ प्रवास!

जीवन के सफर में राहीं

मिलते है बिछड़ जाने को

हस हस के इन्ही राहों में

खोना पड़ा इक अपनेको

हस हस के इन्ही राहों में

अपनाया था बेगाने को |

या अशा प्रवासाला विटलात तरीही तो तुमचा ऐच्छिक निवड नसते. पर्याय नसल्याने तो स्वीकारावी लागते.

हम राही मेरे हमसफर

नयी है राह नयी रह्गुजर|

काही काळ या रस्त्यावर इतकी वदले येतात इतकी संकटे येतात, कि रस्ताच हरवून जातो.

दुनियावालोनसे दूर

जलनेवालोनसे दूर

आजा आजा चले कही दूर कही दूर |

पण जगाच्या रिती रिवाजांपासून दूर जाणे शक्यच नसते पदरी तनहाई येते

जिवनके सफर में तनहाई

हमको तो ना जिंदा छोडेगी

मरने कि खबर ओ जाने जिगर

मिल जाये कभी तो मत रोना|





अशी निराशाच येते. भाई बस दूर, अब चलना कितने दूर? कधी युही कोई मिल गया था काळ राह चलते चलते " म्हणायचे . कधी काटोपर चलने वालोंको चैन कहा और आराम कहाँ?मुक्कामाला पोहोचे पर्यंत पायपीट, आटापिटा, त्रास रस्तासुद्धा मुक्कामा एवढा आनंदी होणे शक्य नसते का? का?

जुदा मेरी मंजिल जुदा तेरी राहे

मिलेगी न अब तेरी मेरी निगाहे

मुझे तेरी दुनिया से दूर जाना |

असे म्हणत राही अज्ञाताच्या वाटेवर निघून जातो. ते चालणे थांबते.

जिंदगी का सफर है ये कैसा सफर

कोई समझा नहीं कोई जाना नहीं

हि वाट दूर जाते अज्ञात अशा गावा

माझे मनातला का,तेथे असेल रावा!





# 31 राम रतन धन पायो

राजस्थानातील चित्तोड गडावरचे मीरा मंदिर बघून मी भक्तीमय झाले

पायोजी मैंने रामरतन धन पायो

वस्तु अमोलिक दी मेरे सतगुरु

क्रिपा कर अपनाओ ||धृ ||

जनम जनम की पूँजी जग में

वो भी सभी --- कयो ||१||

खरचे नहीं कोई चोर न लुटे

दिन दिन बढ़त सवायो ||२||

सतकि खेवदिया सतगुरु

भवसागर तर आयो ||३||

मीरा कहे प्रभु गिरधिर नागर

हरख हरख जग गया ||४||

वेगवेगळ्या गायकांनी गायलेले हे भजन स्वतः गायल्यावर एक तंत्रच लागते. संत मीराबाईची भजने हा एक भजनांचा अनोखाच प्रकार आहे. खरेतर रोजच्या जीवनातील स्त्री

ची रूपे, राजाच्या राणीची राजस भक्ती ,वास्तवातून, वेगळयाच स्तरावर गेलेली, अध्यात्माची भावना ,यांचा संगम या भजनात आहे.

संत मीरेला जेव्हा विष प्राशनाने वेदना झाल्या तेव्हा श्रीकृष्णाची मूर्ती काळी पडते. "दर्शन जल कि प्यासी मीरा पी गई विष का प्याला" अशा शब्दात मीरेच्या प्राणांतिक प्रेमाचे वर्णन केले गेले आहे. त्याच्यातील त्या भक्ती बंधनाचे वर्णन केले आहे. मीरा देवी एक भक्तीचे गावच आहे.

इक राधा इक मीरा, दोनोकी शामको चाहा

अंतर क्या है दोनोंकी चाह में  बोलो

एक प्रेम दीवानी एक दर्द दीवानी

लोग कहे मीरा बावरी

मीरा के प्रभु या भावनेनेच आपण श्री कृष्णाकडे बघू लागतो.

राधाका भी श्याम है,तो मीरा का मी श्याम, अशा शब्दांनी आपण मीरा बाईंच्या भक्तीचा सन्मान करतो. भक्ती मार्गावरील या योगीनीला मनःपूर्वक नमस्कार!

मेरे तो गिरधर गोपाल दुसरा न कोई

चाहे तो कुसुम्बी रंग नि साडी दे

या दे भगवा देस

चला वही देस

मीराबाई श्रीकृष्णा वरील भक्तीने वाहात जीवनाचे पैलतीरावर पोहोचली.





# 32 मागचा बाक

आज पहाटे, पहाटे मला स्वप्न पडले - मी कॉलेजमधल्या शेवटच्या त्या बाकावर कविता लिहित बसले आहे. तास संपला. सर्व विद्यार्थी वर्ग सुटल्यावर बाहेर निघून गेले. कविता लिहीण्याच्या नादात मला वास्तवाचे भान राहिले नाही. कविता पूर्ण झाली मी वर बघितले, पश्चिमेला खिडकीतून रंगांची उधळण दिसत होती. मी उठले वर्गाबाहेर पडले. कॉलेजच्या लांबच लांब व्हरांड्यात, कॉरीडॉरमध्ये शांतता होती. उंच, उंच कमानी अंधारू लागल्या होत्या. पक्षीही हळूहळू घराकडे परतून िकलबिलाट करत होते. मला पळायला हवे हे जाणवले. मी घावरले, माझ्या बाकीच्या मैत्रिणी कुठे गेल्या? कदाचित कॉलेजातून शहरात जाणारी बस सुध्दा गेली असेल. वर्गातील फर्स्टक्लास फर्स्ट करीयर वाली मुलगी मी, कुठून हे कविता लिहिण्याचे प्रेम सुचले? ही त्या कॉरिडॉरमधून खेळाच्या मैदानंातील झाडाखाली त्यांच्यापैकी कुणी बसले आहे का ते शोधले. कुणीच सापडले नाही. मी सैरावैरा पळायला व त्यांना शोधायला सुरुवात केली. त्यांना शोधत मी रेल्वे ट्रॅकवर आले. ट्रॅकवरुन चालत रस्ता हरवला आणि रेल्वे आली म्हणून बाजूला झाले. पुन्हा चालते झाले. समोर माझ्या कॉलेज क्लासरुमची मागची बाजू होती. मी वर्गात शिरले व मागच्या बाकावर बसले. समोर परीक्षेचा पेपर आला. पेपर देताना बाकीचे सहाध्यायी कुणीच नव्हते. शिकवलेल्या धड्यांचा या जीवन प्रश्नाशी काहीही संबध नव्हता. मी परीक्षेत नापास झाले तर? मला त्या मागच्या बाकाचा राग आला.

मी वैतागले आणि मला घड्याळाच्या गजराने जाग आली.ते स्वप्न होतो. आठ ते आठच्या वेठबिगारीसाठी,नोकरीसाठी मी कपडे घालून रेल्वे स्टेशनच्या दिशेने चालू लागले. पोटासाठी पकडलेल्या नोकरीकडे ,जाऊ लागले. लोकल आली, कांदे बटाटे पडावे तशी माणसे ऊतरली, मी चढले,लोकलच्या डब्यात मी मागच्या बाकावर बसले. पुढे बसलेले,दारात ऊभे लोक हसत, खेळत होते. त्यांची खरेदी, विक्री चालू होती. त्यांच्या गप्पाटप्पात, त्यांनी मला अध्याहृत धरले होते ,दुर्लक्षलेले होते. लोकल थांबली, मी शेवटी उतरले. बसच्या रांगेत ऊभी राहिले, बसस्टोपमध्ये मी बाकावर मागे बसले. इतर जण पुढे घुसून जात होते. काही वेळाने खरे तर वेळ निघून गेल्यावर बस आली. बस मध्ये सुध्दा मी

मागच्या बाकावर बसले. मी कुणाच्या खिजगणतीत नव्हते. एक इसम, तिकीट पाच रूपये एवढीच माझी किंमत होती. मी असहाय्य होते. अॉफिसच्या बसस्टॉपवर उतरले. माझ्याबरोबरचीच एक वर्गमैत्रीण बॉस म्हणून प्रसिध्द झाली आहे. तिने मला तिच्या होंडा गाडीतून हात केला. मी नाराज मन लपवून अॉफिसमध्ये आले. माझ्या त्या अॉफिसमधील कोपऱ्यातील मागच्या जागेवरिल खुर्चीवर बसले. अॉफिसमध्येही माझ्या येण्याजाण्याची दखल घेणारे, फारसे कुणी मित्र मैत्रीणीचे मेळावे नव्हते.

दिवस कामात गेला. घरी आल्यावर मुलगा तक्रार करीत म्हणाला "आई मी उंच आहे, म्हणून मला मागच्या बाकावर बसवतात, मला आवडत नाही."

"ठीक आहे, मी शिक्षकांना भेटेन, बोलेन, पण पुढच्या बाकावर बस. मागच्या बाकाने माझे फार नुकसान केले रे!"

मी विचार करू लागले, कुठल्याही शाळा कॉलेज मध्ये मागच्या बाजूच्या बाकावर बसणारे विद्यार्थी, लक्ष न देणारे, थोडेसे ढ, बरेचसे मस्ती करणारे असतात. मागच्या बाकावरच्यांच्या गप्पाटप्पा, लिखाण, खेळीमेळी चालू असते. त्या उलट पहिल्या बाकावर बसणारे हुषार, अभ्यासू, ध्येयवादी असतात.

नाटकाला पहिल्या रांगेत बसणारे व्हि. आय्. पी. किंवा लेखक, टिकाकार असतात. तर मागच्या रांगांत नुसतेच खुर्च्या गरम करणारे असतात, असा समज आहे. सिनेमाच्या थिएटरांचे मागचे बाक तर नेहमीच कसे कुप्रसिध्द असतात. मागच्या रांगांकडे वळून पाहिले तरीही आई रागावत असे.

कॉलेज जीवनात मागच्या बाकावर बसून वह्यांमध्ये चित्र खरवडणे, सामानाची यादी करणे, कपड्यांचे ड्रेस डीझाइन बनवणे, आवडती गाणी लिहीणे, टिकटॉकचा म्हणजे गोळा आणि फुलीचा खेळ खेळणे अशी कामे आपण नेहमीच करतो. त्या कविता, ती गाणी आयुष्यात यश देऊ शकत नाहीत. मागच्या बाकावर शेजारी बसणाऱ्या मित्रमैत्रीणी संकटात कधी सोबत करीत नाहीत. मागच्या बाकावर बसून त्या, त्या अल्लड वयात तुम्हाला जी गंमत



वाटत होती, ती आयुष्यात पुढे "मजेची सजा" झाली, असेच म्हणायला लावते. मागच्या बाकावर लबाड आपल्या नोटस् साठी आपल्याला त्यांच्यात खेचतात. त्यांच्याबरोबर आपण मागे पडतो. ते मागेच पडलेले असतात, त्यांची ध्येय वेगळी!

हॉटेलमधल्या मागच्या बाकावरचे गिऱ्हाईक चार तास गप्पा मारुन कटींगचा चहा पिऊन जाते. हे मालकाला माहित असते. कोर्टात मागच्या बाकावर बसून कामकाज बघणारे फक्त नंबर म्हणूनच काऊंट होत असावे. स्टेडीयमच्या मागच्या बाकावरचे लोक पिटातल्या प्रेक्षकासारखे मानले जातात. मग असे काय असते की मागच्या बाकाचे माणसाला आकर्षण वाटते? मागचा बाक मित्र का वाटतो? तोच मित्र पुढे शत्रू का बनतो?

मला माझ्या कॉलेज जीवनातील एक मुलगा नेहमी आठवतो. खरेतर माझ्यापेक्षा त्याला कमी मार्क होते पण पुढे त्याने अभ्यासात जोर मारला. जाडभिंगाचा चष्मा लावून तो पहिल्या रांगेत बसत असे. घोगऱ्या अ◌ावाजात तो वेगवेगळया खास शंका विचारत असे. आंम्ही सरांच्या शिकवण्याकडे लक्ष देत नसू, त्याच्या शंका तर काय अगम्यच वाटायच्या. मागच्या बाकावर बसून पाय, पुस्तक व चष्मा असे त्याचे कार्टून काढून सर्वांना दाखवत असे. आम्ही मैत्रीणी त्याला हसत असू. आज तो प्रथितयश शल्यचिकित्सक आहे. आम्ही मागच्या बाकावरच्यापैकी सर्वजण पोटासाठी कुठेकुठे विखुरलो आहोत. एकदा वर्गात "अभ्यास करत जा, काळाला रिवाईंडचे बटण नसते." असे त्या बाकाने मला घोगऱ्या आवाजात, मागच्या बाकावर येऊन सांगितले होते. तो मेडीकलला गेला. मी मागे पडले आणि त्याच मागच्या बाकावर बसून डोळयांच्या शिंपल्यात अश्रू लपवत राहिले. कागदावर काही लिहित राहिले. शब्द धन वाटायचे! कधीतरी या अश्रूंचे मोती होतील. अशी आशा बाळगायचे. कधीतरी माझ्या कविता लोकप्रिय होतील. कॉलेजच्या दिवसात मागचा बाक स्थितप्रज्ञ राहीला. तेव्हा साथ देऊन मला मागच्या बाकाने फसवले. मला मागचा बाक आठवतो पण ---------मागच्या बाकाचा चकवा बोचत राहातो!

शुभांगी पासेबंद

९८६९००४७१२

# शुभांगी पासेबंद



जर्नालिझम मध्ये गोल्डमेडल मिळवणार्‍या आणि लोककला अकॅडमीमधून डिप्लोमा मिळवणार्‍या शुभांगी पासेबंद (MSc. B. Ed.) एका बड्या बॅंकेचं मॅनेजरपद सोडून आता पूर्णवेळ लेखनात उतरल्या आहेत. ई साहित्यच्या वाचकांना त्यांच्या कादंबर्‍या माहित आहेतच. त्यांच्या कस्तुरीपक्षी, राहू दे घरटे आणि तुझेच मी गीत गात आहे या तिन्ही कादंबर्‍यांना वाचकांनी भरभरून प्रतिसाद दिला. या व्ही कादंबर्‍यांतून स्त्रीची विविध रूपे आणि स्त्रीजीवनातला संघर्ष यांची प्रचिती वाचकांपर्यंत नेण्यात त्या यशस्वी ठरल्या.

ई साहित्यच्या पलिकडेही शुभांगीजींचे नाव गाजत असते. लोकसत्ता, पुढारी, प्रहार, गांवकरी अशा अनेक वृत्तपत्रांतून त्या स्तंभलेखन करत असतात. आजवर त्यांचे जवळपास चारशे ललित लेख प्रसिद्ध झाले आहेत. याशिवाय स्त्री, ललना, मेनका, गृहलक्ष्मी, प्रतिभा अशा अनेक नियतकालिकांतून त्यांचे लेखन प्रसिद्ध झाले आहे. आजवर त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले असून त्यात सावित्रीबाई फुले पुरस्कार, महाराष्ट्र दीप पुरस्कार, प्रफ़ुल्ल दत्ता “कुशल संपादक” पुरस्कार व उत्कृष्ट समाजसेविका पुरस्कारांचा समावेश आहे. शुभांगीजींच्या “ क्या इतनी बुरी हूं मैं मां” हा स्त्री भ्रूणहत्याविरोधी एकपात्री प्रयोग आणि “ नाते शब्दांचे” हा कार्यक्रमाचेही अनेक प्रयोग होत असतात.

ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े शुभांगीजींना पुढील लेखनासाठी अनेकानेक शुभेच्छा.





# शुभांगी पासेबंद यांचे इतर प्रकाशित साहित्य

1 मयूरमासा कादंबरी - 2012      हार्ड  कॉपी  ,मुंबई

२. नाते शब्दांचे- ललित - 2014     हार्ड  कॉपी पुणे

3. मुलीही जन्माला येऊ द्या -ललित-2015   हार्ड  कॉपी,पुणे

4. रंगकेशरी - कादंबरी- इ-बुक - 2015

5. बिलिव्ह इट ऑर नॉट- कथासंग्रह - इ-बुक - 2016- विनामूल्य

6. कस्तुरी पक्षी- इ बुक- कादंबरी- इ साहित्य – 2016- विनामूल्य

7. एक दिवा लावूया - स्तंभ संग्रह - 2016-इ बुक

8. जाईन मी विचारीत- स्तंभ संग्रह - 2016--ईबुक

9. राहू दे घरटे- इ साहित्य - कादंबरी-2016  -ई साहित्य- विनामूल्य

10. मी तुझेच गीत गात आहे-  इ साहित्य - कादंबरी-2016- विनामूल्य

११. आम्रकुसुमांजली - स्तंभ संग्रह-इ साहित्य- विनामूल्य : आगामी

१२ सोनमोहोरगंध       -स्तंभ संग्रह-इ साहित्य- विनामूल्य : आगामी

१३ कृष्णकुसुमांजली     -स्तंभ संग्रह-इ साहित्य- विनामूल्य

१४. मधुर दंश कथासंग्रह - 2016 (आगामी) हार्ड  कॉपी,पुणे

१५. (आगामी)- कुठे शोधिसी रामेश्वर- पर्यटन विषयक लेख, नागपुर

सर्व पुस्तके ई बुक स्वरूपात उपलब्ध आहेत.





# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. त्याशिवाय वर्षाला सुमारे तीस ते चाळीसलाख वाचक वेबसाईटवरून पुस्तके डाऊनलोड करतात.

अर्थात याने आमचं समाधान नाही. सुमारे बाराकोटी मराठी माण्सांपैकी किमान अर्धे म्हणजे सहा कोटी लोक “वाचक” व्हावेत अशी आमची इच्छा आहे. माउलिंनी सांगितलंय. “जो जे वांछिल ते तो लाहो”. आमचीही वांछा “तो” पूर्ण करील. करीलच.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail.com या पत्त्यावर पाठवा बरं!